रविवार, 23 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -77
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 23 OCTOBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-77 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# शेतकऱ्यांना 1 रुपयाही डोंगराएवढा वाटतोय !

## 50 खोकेवाल्यांना कधी समजणार : राजू शेट्टी

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर : परतीच्या पावसाने राज्यभर धुमाकूळ घातला आहे. यामध्ये शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकांची काढणी काही दिवसांवर आली असताना असा नास झाल्याने शेतकरी हतबलझाला आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील काही भागाची पाहणी केली. यावेळी अस्मानी व सुल्तानी संकटामुळे शेतकऱ्यांना 1 रूपया म्हणजे गाडीच्या चाकासारखा वाटू लागला आहे. याची किंमत 50 खोकेवाल्यांना कधी समजणार? असा प्रश्न राज्य सरकारला विचारला आहे. सोबत कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या वक्तव्याचाही समाचार राजू शेट्टी यांनी घेतला.**



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शेतीच्या नुकसानीची पाहणी केली. राजू शेट्टी यांनी जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी ते म्हणाले, की मी संजय पाटील यांच्या शेतामध्ये उभा आहे. त्यांच्या शेतात फ्लॉवरचे पिक होते. 20 गुंठ्याच्या या प्लॉटमधील पिकाची अवस्था दयनीय झाली आहे. जवळपास 22 हजार रुपये या पिकासाठी खर्च करण्यात आले होते. दोन आठवड्यात सर्व फ्लॉवर मार्केटमध्ये जाणार होता. मात्र, पावसामुळे या पिकाची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. सोन्यासारखे पिक पाण्यामुळे सडायला लागलं आहे. कृषीमंत्री अब्दुल सत्तार म्हणतात अजून ओला दुष्काळ जाहीर करण्याची वेळ आलेली नाही. अब्दुल सत्तार साहेब, ज्या छोट्या शेतकऱ्याची जमीन 20 गुंठे आहे, त्याला 50 हजार रक्कम डोंगराएवढी आहे. कदाचित 50 खोक्याच्या पुढे ती कमी असेल. मात्र, या शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून रुपया म्हणजे गाडीच्या चाकाएवढा आहे. त्यानंतरही तुम्ही शेतकऱ्यांची व्यथा समजून घेणार नसाल तर या शेतकऱ्यांच्या डोक्यात आग भडकल्याशिवाय राहणार नाही. त्यामध्ये कोणकोण भस्म होईल हेही सांगता येणार नाही.

### नुकसानीचे 15 दिवसात पंचनामे होतील : अब्दुल सत्तार

मी स्वत : सगळीकडे दौरा करणार असून, एकही शेतकरी भरपाईपासून वंचित राहणार नाही . तसेच येत्या 15 दिवसांत पंचनामे होतील अशी माहिती कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिलीय . मका, कापूस सोयाबीन नुकसान झालंय, कॅबिनेटमध्ये याबाबत चर्चा झाली, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री भावना समजून घेत आहेत . अनेक जिल्ह्यात ढगफुटी, पावसाने नुकसान केले आहे . पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेत . शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हा पर्याय नाही . पंचनामे करण्यासाठी सॅटेलाईट पाहणी पद्धत तयार करतोय . भविष्यातील अडचणी यातून दूर होतील . मात्र, यावेळेस ग्राउंड वर जाऊनच पंचनामे करावे लागतील असेही कृषीमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले . पीक विमा कंपनी सुलतानी संकट निर्माण करताय, 72 तासात नुकसान कळवणे शक्य नाही, ऑफलाईन तक्रार सुद्धा देत यायला हवी, कुणी उशिरा माहिती दिली तरी शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती घ्यावी लागेल, पीक विमा कंपनी मनमानी करू शकणार नाही, असेही मंत्री सत्तार यांनी म्हटले .

# आज भारत -पाकचे क्रिकेट युद्ध





आधुनिक केसरी न्यूज

**मेलबर्न :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील विश्वचषकाच्या सामन्याची उत्सुकता सर्वांनाच आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यात पाऊस पडणार असल्याची जोरदार शक्यता आहे. कारण हा सामना मेलबर्न येथे रविवारी होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यासाठी मैदानाची पाहणी ही साधारणपणे दुपारी १२.०० च्या दरम्यान करण्यात येईल. त्यानंतर दुपारी १.०० वाजता भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांतील सामन्याचा टॉस होईल.

टॉसचा निकाल लागल्यावर दोन्ही संघांचे कर्णधार हे आपले संघ जाहीर करतील. दोन्ही कर्णधारांनी आपला संघ जाहीर केल्यावर अर्ध्या तासांचा ब्रेक घेतला जाईल. या ब्रेकनंतर हा सामना दुपारी १.३० वाजता सुरु होणार आहे. त्यामुळे हा सामना दुपारी १.३० ते साधारणपणे ४.३० वाजेपर्यंत पाहायला मिळू शकतो. पण जर पावसाने या सामन्यात घोळ घातला तर मात्र हा सामना कधी सुरु होईल, हे सांगणे सर्वात कठीण असेल. कारण पाऊस थांबल्यावर सामन्याचे पंच मैदानाची पाहणी करतील आणि त्यानंतर मैदान कधी सुकवले जाईल याची संपूर्ण माहिती घेतली. त्यानंतर मैदान सुकले की नाही याची ते पुन्हा पाहणी करतील आणि त्यानंतर दोन्ही संघांना सामना कधी आणि किती वाजता सुरु होणार, याची कल्पना देतील. त्याचबरोबर हा सामना किती षटकांचा खेळवण्यात येणार आहे, याची माहितीही ते दोन्ही कर्णधारांना देतील. त्यानंतर दोन्ही संघ या माहितीनुसार आपली रणनीती आखतील. आतापर्यंत भारताने पहिल्या दोन सामन्यांमध्ये मोठे प्रयोग केले होते. या दोन्ही सामन्यांमध्ये विराट कोहली खेळला नव्हता. पण पहिल्या सामन्यात सूर्यकुमार यादवच्या भन्नाट फलंदाजीमुळे भारताने विजय साकारला होता. दुसऱ्या सराव सामन्यात लोकेश राहुलकडे भारताचे नेतृत्व देण्यात आले होते, पण हा सामना भारताला गमवावा लागला होता. तिसऱ्या सराव सामन्यात भारताने संघातील अनुभवी खेळाडूंना संधी दिली असली तरी यामध्ये त्यांनी बरेच प्रयोग केले होते. या सामन्यात रोहित शर्माने संघात पुनरागमन करणाऱ्या मोहम्मद शमीला फक्त एकच षटक दिले होते. या एकाच षटकात शमीने तीन विकेट्स घेतल्या आणि भारताला विजय मिळवून दिला होता. त्यानंतर न्यूझीलंडविरुद्धचा सराव सामना पावसामुळे होऊ शकला नव्हता.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# समृद्धीचे प्रकाशपर्व

आधुनिक केसरी

दोन चिनी माणसे एकमेकांना भेटली म्हणजे, ' तुम्हाला सर्व सहाही सुखे प्राप्त होवोत ' अशा शुभेच्छा ते एकमेकांना देतात. सहापैकी पाच सुखे आपल्या नित्याच्या परिचयाची आहेत. ती म्हणजे संपत्ती, संतती, प्रसिद्धी, मनासारखा जोडीदार आणि उत्तम आरोग्य. मग सहावे सुख कोणते ? तर अर्थातच ते ज्याचे त्याने शोधायचे असते. सहावे सुख प्रत्येकाचे वेगवेगळे असू शकेल. कोणी ते पुस्तकात शोधेल, कोणी आपल्या आवडत्या छंदात, कोणी परमेश्वराच्या नामस्मरणात. पण आपल्यासारखी सामान्य माणसे नेहमी पहिल्या पाच प्रकारच्या सुखातच आयुष्याची इतिकर्तव्यता मानतात. सुखाच्या मागे आपण आयुष्यभर धावत राहतो. पण मनात आतून कुठे तरी बोच असते, की सगळे मिळूनही काहीतरी अपूर्ण आहे. तुमचे सहावे सुख जेव्हा तुम्हाला सापडेल, तेव्हाच तुम्हाला खरे समाधान लाभेल.

मला वाटतं हे सहावं सुख आपण वाचनात शोधायला हरकत नाही. एकदा का आपण पुस्तकांच्या संगतीत राहायला सुरुवात केली ती आपलं बोट धरून आपली वाटचाल आनंदाच्या, सुखाच्या मार्गावर करण्यासाठी मदत करतील.

वाचन प्रेरणा दिन साजरा करताना हे लक्षात ठेवायला हवे की वाचनाची प्रेरणा आजच्या दिवशी जशी आपण घ्यायचा प्रयत्न करतो आहोत तशीच ती आयुष्यभरासाठी कायम राहायला हवी. वाचन किंवा ग्रंथ हे आपल्या जीवनाचा एक भाग व्हायला हवेत. कवी सौमित्र उर्फ किशोर कदम यांची एक छान कविता आहे. या कवितेतील काही ओळींनी आपण आजच्या या लेखाचा समारोप करू या. ते आपल्या मुलांना म्हणतात ' मी तुमच्यासाठी घर, गाडी, बंगला, पैसा यासारखी भौतिक संपत्ती मागे ठेवली नाही. माझ्या वाडवडिलांनीही तशी ती माझ्यासाठी ठेवली नव्हती. पण मी तुमच्यासाठी पुस्तकरूपाने एक अमूल्य अशी संपत्ती मागे ठेवली आहे. तिचा तुम्ही उपभोग घ्या. ते आपल्या कवितेत म्हणतात

मी नसेन तेव्हा ही पुस्तके असतील ।
जी नेतील तुला जायचं आहे तिथे.
फक्त मी असेन तिथे मात्र
तुला पोहोचता येणार नाही कारण
मी आधीच होऊन गेलेलो असेन
एखादी कथा, एखादी कादंबरी, एखादी कविता
एखाद्या पुस्तकातली माझी अनावर आठवण आली
की या प्रचंड ढिगाऱ्यातलं
ते एखादं पुस्तक शोध
तुझा प्रवास बघ कसा
सोपा होऊन जाईल ! **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## मोबाईल वापरताना सामाजिक भान राखावे

आधुनिक केसरी

शाळा, कॉलेजमध्ये, हॉस्पिटलमध्ये, वर्दळीच्या ठिकाणी, बँकेत, सरकारी कार्यालयांत, धर्मस्थळांमध्ये जिथे शांततेची जरुरी असते, अशाही अनेक ठिकाणी ह्या मोबाईलच्या वापराचा आणि त्याच्या विविध प्रकारच्या आवाजाच्या पातळीचा इतरांना किती त्रास होत असतो, ह्याची साधी जाणीवही होत नसते. हे त्या ठिकाणी येणाऱ्यांच्याच बाबतीत घडते असे नाही, तर त्या ठिकाणी काम करणारे देखील सर्रास मोबाईलच्या वापराचा आणि त्याच्या


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आवाजाच्या पातळीचा उच्चांक गाठून उद्रेक करत असतात. मोबाईलचा गरजेपेक्षा अतिरिक्त वापर ही बाब किमान त्या व्यक्तीपुरतीच संबंधित आणि विपरीत परिणाम करणारी ठरू शकते; परंतू सभोवताली असणाऱ्या, वावरणाऱ्या सर्वांना त्याचा त्रास होत असल्याचे न कळणे ही मात्र उणिवच असते. त्यांतही वापरकर्ता स्वमग्नतेमुळे कशाचेही भान राखू शकत नाही, ही खेदाची आणि दुर्दैवाची बाब आहे.

पूर्वी एखाद्याच्याच घरांत टेलिफोन असायचा, त्याचा वापरही मर्यादित होत असे. घरातील शांतता टिकवण्यासाठी टेलिफोनवरील संभाषण देखील आवाजाच्या खालच्याच पातळीत होत असे. अलीकडच्या काळांत त्या टेलिफोनची जागा मोबाईलने घेतली. अर्थातच, तंत्रज्ञानाच्या दृष्टीकोनातून खूपच मोठी क्रांती झाली. पण ह्या क्रांतीमुळे मनःशांती मात्र ढळली असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. पूर्वी घरटी एक टेलिफोन होता, आता माणशी एक मोबाईल आहे. ह्यालाही अपवाद आहेच, कारण काहीजणांकडे दोन-तीन मोबाईल्स असल्याचे दिसून येते. त्यातही मोबाईलवर मोठमोठ्या आवाजात बोलणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. काहीजण मोबाईलचा स्पीकर मोठ्या आवाजांत ठेवून सतत आणि सलग अनेक वेळेपर्यंत बोलत असतात. प्रत्येकाच्या मोबाईलचे निरनिराळे रिंगटोन्स आणि त्याच्या आवाजाची पातळी ह्याचा कोणताही विचार न करता सर्रास त्याचा सर्वत्र वापर केला जात असल्याचे आपल्याला नेहमीच दिसून येत असते.

# संस्कार धन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-43

## कर्म...

आधुनिक केसरी

एक वाक्य नेहमी म्हटलं जातं की, "कर्माचे फळ मिळाले". ज्यांना कर्म म्हणजे काय तेसुद्धा माहीत नाही. पण इतरांच्या बाबतीत आपण सहज म्हणतो की कर्माचे फळ मिळाले. अर्थात ते कर्म हे चांगले असेल किंवा वाईट असेल. कर्म... कर्म असते. पूर्व जन्मीचे कर्म वाईट असो वा चांगले त्याचे फळ म्हणे पुढील जन्मात फेडावे लागते. पण आता या कलियुगात याच जन्मी प्रत्यक्ष आपण जीवन जगत असताना सर्वांसमोर आपल्या चांगल्या अथवा वाईट कर्माची फळं भोगावी लागतात. चांगल्या कर्माची फळं चांगलीच मिळतात. वाईट कर्माची फळे वाईटच मिळणार. "जे पेराल ते उगवेल" कर्माची फळे मात्र उशिरा का होईना मिळतातच. तेव्हा प्रत्येकाने चांगलेच कर्म करत राहावे. झाडांवर, फुलांवर जसे फळ येते तसे कर्माला फळ हे चिकटलेलेच असते. ते आपला पिच्छा सोडत नाही. रात्र झाली अंधार आहे चोर चोरी करतो. त्याला वाटते मला कोणी बघत नाही. पण पापाचा घडा भरला की कर्माचे फळ मिळते. तो पकडला जातो. त्याला शिक्षा होते. त्याच्या रोजच्या क्रिया बंद पडतात. कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. किती हे दुर्दैव !! पण चोरी करणे पाप आहे हा चांगला संस्कार त्याच्यावर झालेलाच नाही. चोरी करणे गुन्हा आहे हे त्याला माहीतच नाही. त्यामुळे तो ते कृत्य, ते कर्म बिनधास्त करत राहतो. त्याच्या दृष्टीने ते एक चांगले कर्म आहे. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो. त्यातून ते घेण्याची त्याला सवय लागते. कर्म कशासोबत खातात हे त्याच्या गावीही नसते. चांगले काय, वाईट काय यातला फरक त्याला कळत नाही. त्याच्या दृष्टीने सगळे वाईट किंवा सगळे चांगले. तो करत असलेले काम त्याला चांगले वाटते. त्याचा तो व्यवसायाच होतो. रात्रंदिवस त्याच्या डोक्यात एकच विचार असतो चोरी. आपल्याला मात्र आपले कर्म चांगले करायचे आहे.

# लोभ

आधुनिक केसरी

एक भिकारी होता. तो रोज गावात लोकांना भीक मागायचा. मिळेल ते खायचा. काही मिळाले नाही, तर पाणी पिऊन जगायचा. त्याला या जीवनाचा कंटाळा आला होता. त्याला कोणीतरी सांगितले की 'तू गावाबाहेर नदीकाठी इंद्राची पूजा कर. तो प्रसन्न होईल आणि तुला श्रीमंत करेल'. तो त्याप्रमाणे करतो. इंद्र प्रसन्न होतो.

इंद्र त्याला म्हणतो, की 'तू तुझी झोळी पुढे कर. मी त्यात पैसे टाकत जाईत. तू जेव्हा थांब म्हणशील, तेव्हा मी थांबेन. मात्र, हे लक्षात ठेव, जर तुझी झोळी फाटली व पैसे खाली पडले तर त्यांची माती होईल. तो भिकारी आपल्या झोळीत मावेल एवढेच पैसे घेतो व त्याला थांब म्हणतो. तेवढ्या पैशांवर तो आनंदीत होतो. त्यानंतर तो गावात येतो. चांगले कपडे घेतो, घर बांधतो. त्याला एक जण विचारतो की तू एकदम कसा श्रीमंत झालास ? तेव्हा तो त्याला सगळी हकीकत सांगतो. त्या माणसालाही पैशांची हाव सुटते. तो सुध्दा गावाबाहेर जातो. इंद्राला प्रसन्न करतो. इंद्र त्याच्या झोळीत पैसे टाकायला सुरवात करतो. तो आणखी मागत राहतो. शेवटी पैशाच्या हव्यासापायी थांब म्हणायचे विसरतो. त्यामुळे त्याच्या झोळीवर त्या पैशांचा ताण पडतो आणि ती फाटते. सर्व पैसे खाली पडतात व त्यांची माती होते. त्याचबरोबर इंद्रही नाहीसा होतो. त्याच्यापाशी रडण्याशिवाय काहीच उरत नाही.



# "निरुपण"

आधुनिक केसरी

## अंबानाम-महात्म्य

**अंबेच्या दासाशी भय नाही ठावे रे।**
**मुखी नाम घेता अंबा प्रकटे रे।।**
**कालिदासाने पूजिली काली**
**विष्णुदासाने रेणुकामाई**
**चंद्रहासाने चण्डीभवानी**
**हित तयांचे करण्या अंबा धावे रे।।**
**देवादिका माय प्रेरणा देती**
**लक्ष्मीपती हयग्रीव होती**
**उतथ्याची ऐंबीज ख्याती**
**हित तयांचे करण्या अंबा धावे रे।।**
**मधुकैटभ बंधु इच्छामरणी**
**नहुषेन्द्र इच्छितो इंद्राणी**
**महिषासूर वदे गर्ववाणी**
**अहित तयांचे करण्या अंबा धावे रे।।**


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# अनन्यतेतच भक्ति जन्म पावते



आधुनिक केसरी

भगवंतावाचून भक्ति होत नाही. ज्याप्रमाणे सौभाग्यवती म्हटली की तिला नवरा असायचाच, त्याप्रमाणे भक्ति म्हटली की तिथे भगवंत असलाच पाहिजे. भगवंत हा भक्तीचा प्राण आहे. भक्ति आणि माया दोघी भगवंताच्याच स्त्रिया आहेत. पण, म्हणून त्या सवती आहेत. दोन सवती एके ठिकाणी सुखाने नांदत नाहीत हा जगाचा अनुभव आहे. मायेला बाजूला करायची झाल्यास आपण भक्तीची कास धरावी. म्हणजे ती मायेस आपोआप हुसकावून लावते. मायेने वर्चस्व नाहीसे झाले की आपले काम होऊन जाते. तालमीत जाणारा आणि तालमीत न जाणारा यांच्यामध्ये थोडातरी फरक दिसायला पाहिजे; तालमीत जाणाऱ्याच्या शरीरावर थोडातरी पीळ दिसायला हवा ना ! तसेच, जो भक्ति करतो त्याच्या वृत्तीमध्ये थोडा तरी फरक पडला पाहिजे. आपल्याला जर विद्या पाहिजे असेल तर आपण विद्वानांची संगत धरली पाहिजे, त्याचप्रमाणे आपल्याला भक्ति आणि आनंद पाहिजे असेल तर भगवंताची संगत धरली पाहिजे, सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे. याकरिता अनन्यतेची अत्यंत जरूरी आहे. अनन्यतेतच भक्ति जन्म पावते. द्रौपदीची अनन्यता खरी. भगवंताशिवाय मला दुसरा कोणताच आधार नाही याची खात्री पटणे, हेच अनन्यतेचे स्वरूप. माझी प्राप्ती करून घ्यायची असेल तर भक्ति हेच साधन आहे असे स्वतः परमात्म्यानेच सांगितले आहे. जसे नामस्मरण विस्मरणाने करता येत नाही, त्याचप्रमाणे भक्ति अभिमानाने करता येत नाही. समजा, एखाद्या माणसाचे लग्न झाले. तो काल ब्रह्मचारी होता आणि आज गृहस्थाश्रमी झाला; तरी त्याच्या जीवनांतले इतर व्यवसाय चालूच राहतात. त्याचप्रमाणे, आपण भगवंताचे झालो तरी आपले प्रपंचाचे सर्व व्यवहार पूर्ववत् सुरळीत चालतात. जी जी गोष्ट घडेल ती ती आपण भगवंताला सांगावी. भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव ठेवण्यासाठी, भगवंताला सांगून प्रत्येक काम करावे. भक्तीने भगवंत साधतो आणि फलाशा आपोआप कमी होतात. म्हणून आपण उपासना किंवा भक्ति वाढवावी. 'मी देही आहे,' असे म्हणता म्हणता आपण या देहाचे झालो; तसेच मी देवाचा आहे असे म्हणत गेल्याने आपण देवरूप होऊन जाऊ. पण हे होण्यासाठी सगुणोपासनेची जरूरी आहे. रस्ता चालून गेल्याशिवाय जसे आपले घर गाठता येत नाही, त्याप्रमाणे सगुणोपासनेशिवाय आपल्याला उपाधिरहित होता येत नाही. राम कर्ता आहे ही भावना म्हणजेच सगुणोपासना, आणि हेच खऱ्या भक्तीचे स्वरूप आहे. 'तू जे देशील ते मला आवडेल' असे आपण भगवंताला सांगावे, आणि 'माझ्या देवाला हे आवडेल का?' अशा भावनेने जगात वागावे.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# संत जनाबाई

आधुनिक केसरी




त्या विठ्ठलभक्तीत एवढ्या रंगून जाऊन सेवा करत की, विठ्ठल प्रत्यक्ष येऊन त्यांना सेवेत साहाय्य करत असे. एकदा जनाबाईचे आणि तिच्या शेजारच्या बाईचे शेणाच्या गोवऱ्यांवरून कडाक्याचे भांडण झाले; कारण दोघींनी जवळजवळच गोवऱ्या उन्हात सुकण्यासाठी घातल्या होत्या. त्यांचा हा वाद मिटवण्यासाठी त्याच गावातील पंच तेथे आले. त्यांनी 'तुमच्या गोवऱ्या कशा ओळखायच्या ?', असे त्या दोघींना विचारले. तेव्हा जनाबाईने सांगितले, ''ज्या गोवरीतून 'विठ्ठल' नामध्वनी ऐकू येईल, ती माझी !'' त्याप्रमाणे पंचांनी कानाला गोवऱ्या लावल्या तेव्हा खरंच संत जनाबाईंच्या गोवऱ्यांतून 'विठ्ठल' नामध्वनी ऐकू आला. संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईंनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत. संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरू होते.

श्री संत ज्ञानदेव-विसोबा खेचर-संत नामदेव-संत जनाबाई अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. संत ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. 'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा।।' हा प्रसिद्ध अभंग जनाबाईंचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत-संग घडला होता. संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. 'परलोकीचे तारू। म्हणे माझा ज्ञानेश्वरु।' असे त्यांनी ज्ञानेश्वरांविषयी म्हटले आहे. गवऱ्या-शेण्या वेचताना, घरातील इतर कामे करत असताना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत. जनाबाईंच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथा या ग्रंथात मुद्रित झाले आहेत. त्यांचे अभंग कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा या विषयांवर आहेत. हरिश्चंद्राख्यान नामक आख्यानरचनापण त्यांच्या नावावर आहे. संत जनाबाईंच्या थाळीपाक व द्रौपदी स्वयंवर या विषयांवरील अभंगांनी महाकवी मुक्तेश्वरांना एकनाथांचे नातू स्फूर्ति मिळाली होती. संत जनाबाईंची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत.

आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यापूर्वीच त्या निर्विकार झाल्या आहेत.

संत जनाबाईंच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत.

नामदेवांवरील भक्ति-प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत.

'वात्सल्य, कोमल ऋजुता, सहनशीलता, त्यागी वृत्ती, समर्पण वृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईंच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात,' असे ज्येष्ठ अभ्यासक रा. चिं. ढेरे हे जनाबाईच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात.

तत्कालीन संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपान, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, संत सेना महाराज आदि सत्पुरुषांच्या जीवनाचा, सद्गुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करून संत जनाबाईंनी पुढील पिढ्यांवर एकप्रकारे उपकारच करून ठेवले आहेत. त्यांची भाषा सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडते. संत जनाबाईंचे बरेचसे अभंग नामदेव गाथेमध्ये आहेत.

संत जनाबाई श्री क्षेत्र पंढरपूर येथे महाद्वारी, आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ या दिवशी समाधिस्थ होऊन पांडुरंगात विलीन झाल्या.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व आरोग्य मित्र महाराष्ट्र आयोजित

# आज दिवाळी पहाट 'गझल मुशायरा'

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व आरोग्य मित्र महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. 23 ऑक्टोबर रोजी बहारदार दिवाळी पहाट बहारदार मराठी गझल मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जगभरातील मराठी रसिकांना याचा लाभ घेता यावा यासाठी हा बहारदार मराठी गझल मुशायरा ऑनलाइन माध्यमातून आपल्यापर्यंत पोहचवण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व आरोग्य मित्र महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष चंदूलाल बियाणी यांनी दिली. पत्रकार, लेखक तथा कवी विनोद जैतमहाल यांच्या हस्ते मुशायऱ्याचे उद्घाटन होईल.



उद्घाटक विनोद जैतमहाल

या बहारदार मराठी गझल मुशायऱ्यात गझलकार गिरीश जोशी, राजू आठवले, ऋषभ कुलकर्णी, सोमनाथ सोनवणे हे गझला सादर करणार आहेत. राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सो. लि., परळी वैजनाथ यांच्या सौजन्याने होत असलेला या दिवाळी पहाट बहारदार मराठी गझल मुशायऱ्याचे मीडिया पार्टनर आधुनिक केसरी आहे.
ऑनलाइन बहारदार मराठी गझल मुशायऱ्याचा आस्वाद घेण्यासाठी रसिकांनी रविवार दि. 23 ऑक्टोबर रोजी सकाळी 7 वाजता आधुनिक केसरीच्या https://www.facebook.com/aadhunikkesari/ या अधिकृत फेसबुक पेजला भेट द्यावी, असे आवाहन संयोजक संजय व्यापारी यांनी केले आहे.

सहभागी गझलकार



गिरीश जोशी



राजू आठवले



सोमनाथ सोनवणे



ऋषभ कुलकर्णी

## कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार जमा : मुख्यमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** परतीच्या पावसाने राज्यात पिकांचे मोठे नुकसान झाले असून युध्दपातळीवर पंचनामे करण्याचे निर्देश यंत्रणेला दिले गेले आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या सहा लाख, ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात शासनाने प्रत्येकी ५० हजार या प्रमाणे अडीच हजार कोटी रुपये जमा केले आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. छत्रपती शाहू महाराज, संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथीच्या नाशिक विभागीय कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवारी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे आजवर कधीही दिली न गेलेली विहित निकषापेक्षा दुप्पट मदत सरकारने दिल्याकडे लक्ष वेधले. दोन हेक्टरचा निकष होता. त्याऐवजी तीन हेक्टर क्षेत्रापर्यंत मदत देण्यात आली. गोगलगाय, सततच्या पावसाने या निकषात न बसणाऱ्या पिकांच्या नुकसानीचाही भरपाई देताना विचार झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणारे सारथीचे विभागीय केंद्र आहे. कार्यालयाचा या भागातील उच्च शिक्षण, प्रशासकीय सेवा, परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ होईल.

## विलासबापू प्रतिष्ठानतर्फे निराधार मुलांना कपडे, मिठाई वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महाराष्ट्र राज्याचे रोहयो मंत्री तथा संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे साहेब यांच्या आदेशानुसार व विलास बापू भुमरे प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून अनाथ निराधार मुला-मुलींची दिवाळी देखील धुमधडाक्यात साजरी व्हावी. या हेतूने मागील सातत्याने तीन वर्षापासून प्रवाह परिवारात आश्रम टाकळी अंबड तालुका पैठण जिल्हा संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांना दीपावली निमित्त ड्रेस खरेदी करण्यात येतात. यावर्षी देखील विलास बापू भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने पैठण येथील श्रीराम ड्रेसच्या भव्य दालनातून दिनांक 21 ऑक्टोबर 2022 रोजी मुला मुलींच्या पसंतीनुसार ड्रेस खरेदी करून दिले आहेत. विलास बापू भुमरे यांनी मुलांच्या पसंतीनुसार ड्रेस खरेदी करताना स्वतःलक्ष दिले. यावेळी विलास बापू भुमरे पाटील किशोर पाटील चौधरी शेखर पाटील शिंदे जनार्दन मिटकर दीपक मोरे सर, कैलास बनगैय्या, राजेश मानधने, संजय कस्तुरे ज्ञानेश्वर गोरे रामशेठ आहुजा मनीष औटे प्राध्यापक रामेश्वर गोर्डे हरून पठाण, बबलू पठाण नाना उभेदळ नितीन एरंडे यावेळी उपस्थिती होती.







# अस्वस्थ वर्तमानाच्या नोंदी



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**भविष्याच्या व्याजासाठी वर्तमान गहाण ठेवणे कोणत्याही शहाण्या माणसाला शक्य नाही. कारण त्यागाची, समर्पणाची एक परिसीमा असते. परंतु इथला शेतकरी, कष्टकरी उद्याच्या मंगलमय भविष्यातील दिवाळीसाठी आज आपल्या सुखाची होळी करताना दिसतो आहे. जणू त्याच्या माथी मारलेला हा नित्याचा कर्मभोग ठरू पाहतो. केवळ शेतकरीच नाही तर समाजातला प्रत्येक घटक बेचैन, अस्वस्थ आहे. जागतिक भूक निर्देशांक, आनंद निर्देशांक आणि भारतीय चलनाचे डॉलरच्या तुलनेत घसरणे या सर्व बाबींचे अर्थशास्त्रीय संख्या विश्लेषण केले तर या सर्व गोष्टी आपल्या सहज लक्षात येतील.**

प्रश्न अतिशय साधे आहेत, परंतु त्याची परिणामकारकता गंभीर आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शिकून कोणाला नोकरी लागणार आहे? असा काहीसा सूर गावगाड्यात असायचा. तरीही गरीबाघरची मुले मोठ्या जिद्दीने शिकायची. सोबतीचे, भावकीतले, गावातले हसायचे पण आपण शिकलो तर कोणती ना कोणती नोकरी नक्कीच लागेल हा आशावाद त्यामागे होता. फक्त एका पिढीचे अंतर पडले आणि शिकून कोणाला नोकरी लागणार आहे, ह्या टोमण्याचे प्रत्यंतर येण्यास सुरुवात झाली. समाजमनावर अत्यंत संथगतीने हे बिंबवण्यात आले की, इथून पुढे सरकारी नोकरीची आशा कोणी बाळगू नये. ज्यांना शक्य आहे आणि पैसे खर्च करण्याची तयारी आहे अशा श्रीमंताघरच्या मुलांनी लाखो रुपये मोजून व्यावसायिक शिक्षण घेऊन स्थिर झाले. त्यांनी स्थीर व्हावे यात मोठेपण नाही, ते होणारच होते. कुडाच्या घरात आयुष्य व्यतीत करणारे, दुसऱ्याच्या शेतात, कंपनीत रोज कामाला जाणारे, आपल्या पोटाला चिमटा बसत असला तरी मुलाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या आईवडिलांनी कोणती चूक केली? आई-वडिलांसोबत दिवसभर काम करून रात्रभर अभ्यास करणाऱ्या त्या डोळ्यातील स्वप्नांचे काय? असा साधा सवालही व्यवस्थेला पडू नये? हजारो सुशिक्षित तरुणांचे जत्थेच्या जत्थे गावभर, शहरभर फिरत आहेत. त्यांच्या रिकाम्या हाताचे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळविण्याचे माध्यम नव्हे, असेही साळसूदपणे म्हटले जाते. ज्याचे बरे चालले आहे, तोच अशी भाषा वापरतो. सुशिक्षित बेरोजगारांच्या मनात एक प्रकारची आग आहे. हाताला काम आणि पोटाला सन्मानाने भाकरी मिळाली नाही तर हाच युवक व्यवस्थेसमोर आव्हान म्हणून उभा राहू शकतो. तरुणांचा देश म्हणून फक्त जगात मिरवायचे नसते तर त्या तरुणांना व्यवस्थेत सामावून पण घ्यायचे असते. पूर्वी दहावी-बारावीनंतर युवक सेवायोजन कार्यालयात जाऊन किमान नोंदणी तरी करायचा. आज त्या नोंदणीतही उत्साह राहिला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

कोरोना महामारीनंतर समाज,  बाजार, अर्थव्यवस्था पूर्वपदावर येऊ लागले आहेत. तरीही सर्व सुरळीत चालू राहिले तर पूर्वीसारखी परिस्थिती निर्माण होण्यास आणखी किमान दोन-तीन वर्षे सहजच लागतील. छोटे व्यावसायिक आणि हातावर पोट असणाऱ्यांचे काय हाल झाले हे सर्वांनी अनुभवले आहे. केवळ आर्थिक बाबतीतच असे झाले नाही तर मानसिकदृष्ट्या जे खच्चीकरण झाले त्यातून सावरायला बराच काळ जाऊ द्यावा लागेल. कोरोना काळापासून अनेक लोकांनी टीव्हीवरील बातम्या पाहणे सोडून दिले. त्याला दोन कारणे आहेत. एकतर नको तेवढी भीती या बातम्यांमुळे समाजात पसरली, असा एक आरोप होत आहे आणि ते नसेल तर धार्मिक, सांप्रदायिक अरेरावी चर्चांना आलेले या काळातील उधाण, ही दोन प्रमुख कारणे यामागे आहेत. राज्यघटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरेपूर गैरफायदा या निमित्ताने घेण्यात आला. माझा धर्म, माझा नेता किती श्रेष्ठ आहे हे दाखविण्याच्या नादात आपण समोरच्यांचा किती खालच्या पातळीवर जाऊन अपमान करत आहोत, याचेही साधे भान प्रवक्त्याना असू नये, हे म्हणजे फार झाले. आभासी माध्यमांतून आभासी जगच पाहायला मिळते, याची सामान्यांना खात्री पटली. पै पै साठी याकाळात जिवाचे रान करताना काहीजण कोटीच्या कोटी उड्डाणे घेत होते, तर सामान्यांना औषध गोळ्यांची भ्रांत असताना फाईव्ह स्टार दवाखान्यात दाखल



## क्षितिजापल्याड

होऊन सरकारच्या नावावर लाखोंची बिले काहीजन फाडत होते, अशा अफवा होत्या. या सर्व कारणांमुळे कोणाच्याही अध्यात मध्यात नसणारा सामान्य माणूस भांबावून गेल्यास आपणास आश्चर्य वाटायला नको. हे त्याचे भांबावलेपण मतदानाच्या रूपाने कसे उजागर होते, हे येणारा काळच ठरवेल.

आधी पाऊस नाही म्हणून शेतकरी हवालदिल झालेला आणि आता परतीच्या पावसाने असे झोडपले की, नदी-नाले एक झाले. यात आपले नशीब वाहून जाताना पाहण्याशिवाय शेतकऱ्यांच्या हाती दुसरे तरी काय आहे? सोयाबीनला भाव नाही म्हणून मागच्या वर्षीचे सोयाबीन काही शेतकऱ्यांकडे तसेच आहे. दोन्ही एकत्रच काढता येईल हा अदमास असताना यावर्षीचे वाहून गेले आणि मागचे तसेच पडून आहे. संसार कसा चालवायचा हा मोठा प्रश्न आहे. पाहणी, आणेवारी, पैसैवारीच्या घोळात थोडीबहुत सरकारी मदतीची अपेक्षा असताना शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची जनभावना आहे. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण या घटकांकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले तरच आपण अधिक विकसित होऊ. वीसपेक्षा कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळा पटसंख्येअभावी बंद करण्याच्या विरोधात शिक्षकांचे आंदोलन सुरू आहे. आपल्या कर्मचाऱ्यांना अनेक राज्यांनी जुनी पेन्शन योजना लागू केली, तशीच ती महाराष्ट्रातही लागू करावी, हाही कर्मचाऱ्यांचा मुद्दा ऐरणीवर आहे. या कोणत्याच मुद्यांना प्रस्थापित माध्यमातून म्हणावी तशी प्रसिद्धी मिळत नाही. असे एक ना अनेक प्रश्न पुरोगामी महाराष्ट्रापुढे आहेत. निवडून आल्यानंतर जनतेचे ऐकायचेच नाही असे काही असते का? असा सर्वसामान्यांना प्रश्न पडत आहे. लोकसहभागातून समाजविकास की नेत्यांचा विकास याचा आद्यक्रम ठरवावा लागेल. कारण साधा नगरसेवक एकदा निवडून आला तर आयुष्यभराची कमाई करून मोकळा होतो आणि सामान्य माणसासमोर हात चोळत बसण्याशिवाय काहीच पर्याय राहत नाही. बाकी उच्चकोटीच्या राजकारणाबद्दल न बोललेलेच बरे !

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# ‘मनोरंजना’च्या दुनियेतील नवी पहाट : ओटीटी



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**चित्रपटसृष्टीत दर दिवशी काहीतरी नवी टूम येते व त्याची चर्चा रंगू लागते. खरेतर मध्यंतरी काही महिने या क्षेत्राला अवकळा आल्याचेच चित्र आहे. ‘चंदेरी दुनिये’च्या आकर्षणामुळे मायानगरी मुंबापुरीत लाखो मुले-मुली दाखल होतात. काही जणांचे नशिब पालटते तर काहींच्या नशिबी अपयश येते. मार्च 2019 पासून जगभरात करोनाचा धोका वाढू लागला व लॉकडाऊनमध्ये चित्रपटगृहेही बंद झाली. याच काळात चाहत्यांसाठी एक नवी गोष्ट घडली की, ज्यामुळे या दुनियेत क्रांती घडली. ओटीटी आणि वेबसिरीज या दोन गोष्टींनी चाहत्यांना वेड लावले.अगदी सुरुवातीला वेबसिरीजच्या क्षेत्रात किती यश मिळेल याविषयी शंका व्यक्त केली जात होती.  मात्र, या प्लॅटफॉर्मला मिळत असलेला प्रतिसाद पाहिला, तर येत्या काळात चित्रपट शौकिन चित्रपटगृहात जातील का, असा प्रश्न निर्माण होत आहे.**

मागील दोन वर्षांपासून लॉकडाऊन हा शब्द माहितीचा झाला आहे.अशावेळी घरात बसून काय करायचे,हा प्रश्न अनेकांना पडतो.त्यात मागील वर्षी दूरदर्शनने ‘रामायण,महाभारत,शक्तिमान,जंगल बुक आणि अलिफ लैला’ अशा जुन्या मालिका पुन्हा सुरू केल्या व त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यांचा  ‘टीआरपी’ वाढला.रसिकांना या मालिका पुन्हा बघायला आवडल्या.अँग्री यंग मॅन ‘अमिताभ बच्चन’ आणि काही कलावंतांनी एकत्र येऊन, घरी राहून एक छान सामाजिक संदेश देणारी फिल्म बनवली.ती शॉर्टफिल्म खूप व्हायरल झाली.तसेच प्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी घरी राहून ‘वास्तव २’ नावाची उत्तम सामाजिक संदेश देणारी शॉर्टफिल्म तयार केली आहे. मुख्य म्हणजे घरात राहून या कलावंतांनी काही ना काही क्रिएटिव्ह गोष्टी केल्या. काही कलाकार हे ‘फेसबुक’ आणि ‘इन्स्टाग्राम’ वर लाईव्ह येऊन रसिकांसोबत संवाद साधतात. काही कविता,गाणे म्हणून दाखवतात. तर काही विविध  खाद्यपदार्थ तयार करून त्याच्या स्टोरी या ‘फेसबुक’ आणि ‘इंस्टाग्राम’वर टाकत आहेत.तसेच आता सध्या ‘वेबपोर्टल’मध्ये अनेक पर्याय उपलब्ध आहेत.तुम्ही घरबसल्या मोबाईलवर नवनवीन ‘सिनेमे’,’वेबसिरीज’ बघू शकता.ज्या सिनेमांची क्वालिटी, मांडणी आणि विषय तसेच कलाकार या सर्वच बाबतीत त्या सकस आहेत. घरात तरुण मुलं असली ना, की अनेक माहिती नसलेल्या गोष्टी आपल्याला चटकन समजायला लागतात.सध्या आपण सगळेच वेबसिरीजच्या जाळ्यात अडकलो आहे.काही वर्षांपुर्वी कंप्यूटर आला.नेट आलं.त्यामुळे ज्ञानाचे भांडार आमच्यापुढे कॉम्प्युटरचे हात जोडून स्क्रीन उघडून उभं राहिलं. मग “एका लग्नाची दुसरी-तिसरी गोष्ट...अवंतिका..डान्स इंडिया डान्स सिझन ..सारेगमप लिटील चॅम्प (आर्या-मुग्धा वाला सिझन)आणि स्वप्न ताऱ्यांचे”,जोडीला असंख्य सिनेमे-नाटक यु ट्युबवर बघितले.त्यातून खूप काही शिकायला मिळालं.जमाना जसा बदलत गेला,तसे आम्ही बदलत गेलो.पुढे मग आम्ही स्मार्ट झालो,’स्मार्टफोन’मुळे. मग सगळ्या गोष्टी शब्दशः हातात आल्या.तेव्हा  ‘स्टँडप कॉमेडी शो’ बघितले. काही नाटके पाहिली.घरात बसून सुट्टी खळखळून हसायला लावणारी हवी तर ‘प्रशांत दामले’ ह्याचं कुठलंही नाटक पाहावं हे माहीत झाल्यामुळे “गेला माधव कुणीकडे” हे नाटक युट्यूब वर पाहिलं. आजच्या इंटरनेटच्या जमान्यात अनेक पर्याय उपलब्ध असताना,इतकी वर्ष होऊनही आपली जादू कायम ठेवणाऱ्या या माधवाचं म्हणजेच ‘प्रशांत दामले’ या जादुई कलाकाराचं नाटक पाहणारे ‘फुल्ल टू एन्जॉय’ करणारे माझ्यासारखे अनेक ‘नाट्यरसिक’ असतील असो.नाटक सुरु झाल्यापासून हा चतुरस्त्र एनर्जेटिक कलाकार प्रशांत दामले आणि त्याच्या एनर्जीला परफेक्ट मॅच करणारा कलाकार विनय येडेकर हि ‘धमाल जोडी’ नाटक संपेपर्यंत खदाखदा हसायला लावते.मनाचा आलेला थकवा धावपळीनं आलेला वैताग,उन्हानं आलेली मरगळ कुठल्या कुठं पळवून लावते. “हाऊसफुल्ल”चा बोर्ड बघायला लावणारा प्रशांत दामले हा कलाकार कधीही थकलेला, दमलेला बघायला दिसला नाही.कायम तुकतुकीत तितकाच फ्रेश.त्याच एनर्जीनं रंगमंचावर अर्थात घरात वावरावं तसा वावरणारा, परफेक्ट टायमिंग साधत चौफेर फटकेबाजी करणं. स्वतः नाटक करण्याचा आनंद घेत प्रेक्षकांना नाटक बघण्याचा निखळ आनंद देत राहणं.थोडक्यात नाटक म्हणजे जगणं. सध्या ‘वेबसिरीज’चा जमाना आहे.’एम एक्स प्लेयर,वूट,सोनी लिव्ह,अमेझॉन प्राईम,इरॉस नाऊ, नेटफ्लिक्स,उल्लू आणि शेमारो’ अशी अनेक दालने सध्या आपल्यासमोर वेगवेगळ्या गोष्टी घेऊन आहेत. आजची ही मुलं बोलायला वागायला मोकळी आहेत.भावनांपेक्षा व्यवहार महत्वाचा वाटतो म्हणून असेल कदाचित पण कधीतरी ते विचार आपल्या अंगावर येतात.चित्रपटसृष्टीत दर दिवशी काहीतरी नवी टूम येते व त्याची चर्चा रंगू लागते. खरेतर मध्यंतरी काही महिने या




क्षेत्राला अवकळा आल्याचेच चित्र आहे. ‘चंदेरी दुनिये’च्या आकर्षणामुळे मायानगरी मुंबापुरीत लाखो मुले-मुली दाखल होतात. काही जणांचे नशिब पालटते तर काहींच्या नशिबी अपयश येते. मार्चपासून जगभरात करोनाचा धोका वाढू लागला व लॉकडाऊनमध्ये चित्रपटगृहेही बंद झाली. याच काळात चाहत्यांसाठी एक नवी गोष्ट घडली की, ज्यामुळे या दुनियेत क्रांती घडली. ओटीटी आणि वेबसिरीज या दोन गोष्टींनी चाहत्यांना वेड लावले. अगदी सुरुवातीला वेबसिरीजच्या क्षेत्रात किती यश मिळेल याविषयी शंका व्यक्त केली जात होती. मात्र, या प्लॅटफॉर्मला मिळत असलेला प्रतिसाद पाहिला, तर येत्या काळात चित्रपट शौकिन चित्रपटगृहात जातील का, असा प्रश्न निर्माण होत आहे. हिंदीच्या बरोबरीने मराठी चित्रपटांनाही आता ओटीटी खुणावत असून वेबसिरीजने तर मराठीतही धूमाकूळ घातला आहे.काही वर्षांपासून मल्टिफ्लेक्स चित्रपटगृहे सेवेला हजर झाल्यामुळे ‘सिल्व्हर ज्युबिली’, ‘गोल्डन ज्युबिली’ साजरे करणारे चित्रपटांचे युग मावळले. आता नवे शब्द अस्तित्वात आले. ओटीटी आणि वेबसिरीज हिंदीबरोबरच मराठी चित्रपट किंवा वेबसिरीजने प्रेक्षकांना वेड लावले आहे. त्यातच नवनवे विषय, त्यांची मांडणी समोर येत आहे. इतकेच नव्हे तर नवे चेहरेही प्रचंड लोकप्रियता मिळवत आहेत. काही दशकांपूर्वी शेअर मार्केटमध्ये गडबड करणारा हर्षद मेहता किंवा स्टॅम्पपेपरचा घोटाळा करणारा अब्दुल करीम तेलगी यांचे कारनामे वेबसिरीजच्या रूपाने या प्लॅटफॉर्मवर सादर झाले व त्यांनी लोकप्रियतेचेच नव्हे, तर कमाईचेही विक्रम मोडले. प्रतीक गांधी या व्यक्तीने हर्षद मेहताची केलेली भूमिका खुद्द महानायक अमिताभ बच्चन यांनाही भावली, हेच या प्लॅटफॉर्मचे यश म्हणावे लागेल. आता तर मराठी वेबसिरीजनेही विक्रमांचे ईमले रचलेले पाहायला मिळत आहेत. गेल्या वर्षभरात अनेक मराठी वेबसिरीज या प्लॅटफॉर्मवर सादर झाल्या. तिकिटबारीवर मिळाले नसते, असे यश त्यांना ओटीटीवर मिळाले. ज्या अभिनेत्यांना एखाद्या चित्रपटासाठी मिळाले नसेल इतके प्रचंड मानधन त्यांना मिळताना दिसते. करोना काळात चित्रपटगृहे बंद असताना प्रेक्षकांना घरातून बाहेर पडता येत नव्हते, त्यातूनच या माध्यमाला सुगीचे दिवस आले.आज या क्षेत्रातील जे बडे स्टार आहेत ते देखील या प्लॅटफॉर्मकडे वळले आहेत. सैफ अली खान, मनोज वाजपेयी, अक्षय कुमार, अर्जुन कपूर, नवाजुद्दीन सिद्दीकी, बॉबी देओल, राजकुमार राव, प्रियांका चोप्रा, दीपिका पदुकोन, बबलू पंडित, पंकज त्रिपाठी, विद्या बालन, अनिल कपूर व मनोज वाजपेयी  या बड्या स्टार्सनीही आता याच स्तरावर लक्ष केंद्रित केले आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध कलाकारही यात मागे नाहीत. स्वप्निल जोशीची ‘समांतर’ ही वेबसिरीज तुफान लोकप्रिय झाली. त्या पाठोपाठ जवळपास 10 मराठी वेबसिरीजही आपली लोकप्रियता वाढवून आहेत. समांतर नंतर ‘हाय टाइम’, ‘खाले डंडे’, ‘गोंद्या आला रे’, ‘शाळा’, ‘पांडू’, ‘सेफ जर्नी’, ‘मुव्हिंग आउट’, ‘आणि काय हवे’, ‘वन्स अ इयर’ या वेबसिरीजनी कमाईचे विक्रम केले. स्वप्निल जोशीसह अभिज्ञा भावे, प्रिया बापट, उमेश कामत, भूषण प्रधान, आनंद इंगळे, सुनील बर्वे, दीपक शिर्के, सुहास शिरसाट, महेश मांजरेकर, संस्कृती बालगुडे, आशुतोष गोखले आदी बड्या कलाकारांनीही याच स्तरावर प्रचंड लोकप्रियता मिळवली. भयकथा किंवा रहस्यकथा लिहिण्यासाठी प्रसिद्ध असलेले सुहास शिरवळकर यांच्याच कादंबरीवर बेतलेली ‘समांतर’ ही वेबसिरीज इतकी गाजली की त्याची कानडी, तेलगू, तमिळ व हिंदी आवृत्तीही सादर झाली व त्यांनीही मोठी कमाई केली. **(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आली माझ्या घरी ही दिवाळी



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नेहमीप्रमाणे वाजत गाजत पुन्हा एकदा दिवाळी आली आहे. दिवाळी म्हणजे फटाके, दिवाळी म्हणजे गोडधोड, दिवाळी म्हणजे फराळ, दिवाळी म्हणजे सुट्या, दिवाळी म्हणजे नवीन कपडे, दिवाळी म्हणजे एकमेकांना दिल्या गेलेल्या शुभेच्छा, दिवाळी म्हणजे एकमेकांना दिल्या गेलेल्या भेटवस्तू. दिवाळी ही सर्वांसाठीच महत्वाची आहे. लहान मुलांसाठी, महिलांसाठी, ज्येष्ठांसाठी, शेतकऱ्यांसाठी आणि सीमेवरच्या सैनिकांसाठी सुद्धा. प्रत्येक जण दिवाळीची प्रतीक्षा करतो. दिवाळी म्हणजे आनंद. प्रत्येकाच्या जीवनात कुठल्या ना कुठल्या पद्धतीचे सुखदुःख असतेच परंतु त्या दुःखांना, काळजी, चिंता, तणाव यांना हेतु पुरस्परपणे दिवाळी आहे म्हणून बाजूला ठेवले जाते व स्वतःला बजावले जाते की दिवाळी आहे, आनंदी राहायचे आहे.**

माणसाच्या जीवनामध्ये या आनंदाचे विशेष स्थान आहे. तुम्ही गरीब असाल तरी तुम्ही आनंदी राहू शकता. तुम्ही श्रीमंत असाल तरीही तुम्ही आनंदी राहू शकता. आनंद हा गरिबी आणि श्रीमंतीवर अवलंबून नाही. तो आपल्या मनावर अवलंबून आहे. आज जी परिस्थिती आहे ती उद्या राहीलच असे नाही. आज चांगली परिस्थिती आहे म्हणून मी आनंदी आहे. उद्या जर वाईट परिस्थिती असेल तर मग काय? काही लोकांना दुःखी व्हायला सुद्धा काही कारणं लागतात. आज आनंद आहे उद्या राहील की नाही या चिंतेने सुद्धा लोक आनंदाचा उपभोग घेऊ शकत नाही आणि ते दुःखी होतात .आज मी दुःखी आहे माझ्या जीवनात आनंद येणार की नाही या भावनेने सुद्धा काही लोक दुःखी होतात. दुःख माझ्याच वाटायला नेहमी का येते या भावनेने सुद्धा लोक दुःखी होतात. परंतु वास्तविक पाहता परिस्थिती ही परिस्थिती आहे. घटना या घटना आहेत. आपण त्यांना कसे घेतो, आपण त्यांना कोणते लेबल लावतो, आपण त्यांना कसे घट्ट पकडून ठेवतो, त्यांची वेळ समाप्त झाल्यावर सुद्धा आपण त्यांना जाऊ देत नाही. त्यांना घट्ट पकडून ठेवतो यामुळे सुद्धा आपले दुःख आपल्या सोबत राहते. आपल्या घरी नवीन टीव्ही घेतला त्या दिवशी त्या टीव्हीचा आनंद असतो परंतु दोन वर्षानंतर जर तुम्हाला त्या कोणी टीव्ही बद्दल शुभेच्छा दिल्या तर तुम्ही म्हणाल ह्यात काय नवीन आहे. यात कसला आनंद. विजेच्या कडकडाटा मध्ये टीव्हीची पिक्चर ट्यूब उडून गेली मग तुम्ही नवीन पिक्चर ट्यूब लावली. तरी ज्या ज्या वेळेला वेळेला वीज कडाडेल त्या प्रत्येक वेळेला तुम्हाला आठवण येईल की अरे हो आमच्या टीव्हीची पिक्चर ट्यूब विजेच्या कडकडाटामुळे खराब झाली होती. म्हणजे जेव्हा ती पिक्चर ट्यूब चांगले काम करीत होती त्यावेळेला त्या पिक्चर ट्यूब चे काहीही महत्त्व नव्हते. परंतु ती गेल्यावर अनेक वर्ष पर्यंत त्या गोष्टीचे दुःख आपल्या मनात राहते. यावरून आपल्या असे लक्षात येईल की दुःख करणे हा तर आपला स्वभाव नाही ना! अनेकांचा तो स्वभाव असतो. आनंद साजरा करणे हा स्वभाव नसतो. दुःख साजरे करीत राहणे हा स्वभाव असतो. अशा माणसाला आपल्या दैनंदिन जीवनातल्या सर्व दुःख, चिंता, तणाव यांना बाजूला सारून आनंद व्यक्त करायला लावणारी दिवाळी आहे.


आपल्या पूर्वजांनी आपल्या सर्व सणांची रचना ही फार विचारपूर्वक केलेली आहे. वेगवेगळ्या ऋतूमध्ये वेगवेगळे वेगवेगळे सण आणि उत्सव येतात. आपला समाज हा उत्सवप्रिय आहे. आम्ही वेगवेगळ्या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येतो. प्रत्येक उत्सवाच्या मागे सामाजिक संदेश आहे. लोकांनी एकत्र यावे, एकमेकांच्या मनामध्ये असलेली कटूता दूर करावी, आनंद साजरा करावा यासाठी सण आणि उत्सव असतात. दिवाळी सुद्धा आनंद साजरा करण्याची प्रेरणा देणारा सण आहे. दिवाळी आपल्याला संदेश देते की आपण वर्षभर कसे आनंदी राहावे. दिवाळीमध्ये आनंद आपण साजरा करतो. परंतु हा आनंद टिकून राहिला पाहिजे. वर्षभर आपण आपल्या मनामध्ये दिवाळी सारखे आनंदी विचार ठेवणे हे आवश्यक आहे. बघायला गेलो तर समाजामध्ये दुःख खूप आहे. कोरोनाच्या काळामध्ये आपल्यापैकी अनेकांनी आपले आप्त स्वकीय लोक यांना गमावलेले आहे. हजारो घरांमध्ये कोणी ना कोणी माणूस त्यांना सोडून गेलेला आहे. हे दुःख असले तरीही दिवाळी ही आपल्याला आनंदी राहण्याचा संदेश देते. कारण जो निघून गेलेला आहे त्याला सुद्धा आपण आनंदी आहोत हे बघून निश्चितच चांगले वाटेल. आणि म्हणून त्यांना चांगले वाटण्यासाठी आपण आनंदी राहिलो पाहिजे.समाजामध्ये बेरोजगारीची समस्या आहे. ऑनलाइन शॉपिंग मुळे सुद्धा दुकानदारांचे व्यवसाय कमी झालेले आहेत. पूर्वीसारखे धंदे राहिलेले नाहीत. सरकारी नोकऱ्या तर बोटावर मोजण्या इतक्या लोकांनाच मिळतात.बाकीच्यांना तर खाजगी नोकऱ्या कराव्या लागतात. तिथे सुद्धा खूप मोठी स्पर्धा आहे. नोकऱ्या सुद्धा सोप्या राहिलेल्या नाही.सरकारी नोकरदारांवर सुद्धा खूप मोठा कामाचा बोजा असतो. त्यामुळे नोकरी खाजगी असो किंवा सरकारी ती सुद्धा सोपी राहिलेली नाही. पूर्वीसारखे ऐषआरामाचे दिवस आता कोणत्याच नोकरीमध्ये नाही व धंद्यांमध्ये सुद्धा खूप मोठी स्पर्धा निर्माण झालेली आहे. त्यामुळे नोकरी करणारा असेल किंवा व्यवसाय करणारा या सर्वांच्याच मागे चिंता ही सातत्यानी लागून राहिलेली आहे. अशाही परिस्थितीत लोक दिवाळी ही आनंदाने साजरी करतात ही कौतुकास्पद गोष्ट आहे. कोरोना मध्ये तर अनेकांचे उद्योग पार बुडाले. अनेकानेक लोक देशोधडीला लागले. तरीसुद्धा ही दिवाळी कोरोना नंतरची दिवाळी आहे, निर्बंधानंतरची दिवाळी आहे ही मुक्तपणे आनंदाने साजरी करायला लोक पुन्हा एकदा तयार झालेले आहेत हे फार चांगले लक्षण आहे.



आपण दिवाळी ही वेगवेगळ्या दिवसांच्या नावाने साजरी करीत असतो. वसुबारस याला गोवत्स द्वादशी सुद्धा म्हटले जाते. या दिवशी आम्ही गाईची व तिच्या वासराची पूजा करतो. आमचा देश हा कृषीप्रधान आहे. आमची संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. गाईला गोधन असे म्हणण्यात आलेले होते. वसु ही धनाची देवता आहे. आमच्या घरी राहणारी वसु कोण? तर ती गाय म्हणून या गाईचे पूजन आम्ही करतो. गाय आम्हाला दूध देते, शेतीसाठी बैल देते व शेणाच्या माध्यमातून आमच्या शेतीची उर्वरा शक्ती वाढविण्यासाठी शेण सुद्धा देते. अशा गाईचे पूजन म्हणजे वसुबारस. त्यानंतर येते धनत्रयोदशी. धनाची देवता कुबेर म्हणून या कुबेराचे पूजन, सर्व वैद्यक शास्त्राचे देव धन्वंतरी, या धन्वंतरीचे सुद्धा पूजन या दिवशी करण्यात येते. त्यानंतर येते नरक चतुर्दशी. भगवान श्रीकृष्णांनी अजेय आणि पराक्रमी अशा नरकासुराचा वध केला. या नरकासुराने त्याच्या कैदेमध्ये 16 हजारापेक्षा अधिक कन्या, ज्या दैवी संस्कृतीला मानणाऱ्या होत्या म्हणजे देवतांचे पूजन करणाऱ्या होत्या त्या कन्यांना पकडून आपल्या महालात ठेवले होते. जेणेकरून ह्या कन्यांचा विवाह होऊ नये. विवाह झाला तर यांना संतती होईल व ही संतती सुद्धा दैवी संस्कृतीला मानणारी होईल. नरकासुराची नगरी सुद्धा लंकेप्रमाणे अजेय होती. नरकासुर सुद्धा अस्त्र शस्त्र संपन्न होता. परंतु भगवान श्रीकृष्णांनी या नरकासुराचा वध केला व त्याच्या कैदेत असलेल्या 16000 कन्यकांना मुक्त केले. परंतु त्या कन्यका भगवान श्रीकृष्णाला म्हणाल्या की भगवान आम्ही आता कुठे जावे? कारण नरकासुराने तर आम्हाला पळवून आणले होते. त्यामुळे आमच्याशी कुणीही विवाह करणार नाही. आम्ही आता पुढील जीवन कसे जगावे? त्यावेळेला भगवान श्रीकृष्ण त्यांना म्हणाले की यानंतर तुम्ही ईश्वर चिंतन करण्यामध्ये किंवा तुमच्या मर्जीप्रमाणे तुम्ही आपलं काळ व्यतीत करू शकता. तुम्हाला जर कोणी विचारले की तुमचा पती कोण तर त्याला तुम्ही माझे नाव सांगा. मी तुमच्या सगळ्यांचा स्वीकार केलेला आहे. अशा पद्धतीने भगवान श्रीकृष्णांनी त्या सोळा हजार कन्यकांचा स्वीकार केला. त्यानंतर त्या निघून गेल्या. आपण या मागील वस्तुस्थिती लक्षात न घेता कृष्णाला 16000 बायका होत्या असे आपण म्हणतो. पण त्या मागील अर्थ लक्षात घेत नाही. समाजामध्ये सुधारणा करायची असेल नवीन क्रांती आणायची असेल तर ती क्रांती आणता येते पण त्या क्रांतीसोबत आलेल्या इतर गोष्टींचे सुद्धा उत्तर द्यावे लागते. भगवान श्रीकृष्णांनी 16000 कन्यकांना व समाजाला हे उत्तर दिलेले आहे. आजही लव जिहाद मध्ये अनेक मुलींना फसवून पळवून नेले जाते. परंतु ज्या वेळेला त्यांना पश्चाताप होतो व त्यांना परत यायचे असते त्यावेळेला त्या कन्यांशी विवाह कोण करणार हाच मोठा प्रश्न उपस्थित होतो. आज जर एखाद्या मुलीशी लग्न करायला कोणी तयार होत नाही तर 16000 मुलींचे जीवन तर उध्वस्त झाले असते. भगवान श्रीकृष्णांनी ते उध्वस्त होण्यापासून वाचविले हा किती मोठा सामाजिक संदेश नरक चतुर्दशीमध्ये लपलेला आहे. या दिवशी जो पहाटे उठेल स्नान करेल त्याला नरकाचे भय राहणार नाही असे म्हणतात. या दिवशी सर्व लोक पहाटे उठून अभ्यंग स्नान करतात. त्यानंतर येते लक्ष्मीपूजन. या दिवशी आपल्याला धनधान्य, स्थैर्य, समृद्धी व सुख देणारी जी लक्ष्मी आहे त्या लक्ष्मीचे पूजन करण्यात येते . व्यापारी वर्ग या दिवशीपासून नवीन वर्षाची सुरुवात करतात. नवीन खाते पुस्तकांची सुरुवात करतात. घरोघरी लक्ष्मीची पूजा केली जाते. लक्ष्मीच्या मूर्ती घरोघरी पूजेसाठी आणल्या जातात. एकूण दिवाळीमध्येच कुंभारांना दिवे बनविण्याचे, लक्ष्मीची मूर्ती बनविण्याचे काम मिळते. दिवाळीमुळे आमच्या अर्थव्यवस्थेला सुद्धा चालना मिळते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यानंतर येथे बलिप्रतिपदा. राजा बलि याचा पराभव करून वामनाने त्याला पाताळात पाठविले व प्रजेला भयमुक्त केले. परंतु तो बलि सुद्धा भगवंताचा भक्त होता. त्या बळीचे स्मरण म्हणजे बलिप्रतिपदा. या दिवशी मुलगी आपल्या वडिलांना ओवाळते. त्यानंतरचा दिवस म्हणजे भाऊबीज. मृत्यू देवता यम व त्याची बहीण यमुना किंवा यमी, यम याच दिवशी आपल्या बहिणीच्या घरी गेला होता व तिने त्याचे स्वागत ओवाळून केले होते. त्यामुळे या दिवशी बहिणी भावाला ओवाळतात. मुली चंद्राला सुद्धा ओवाळतात. भावा बहिणी मधले प्रेम वृद्धिंगत करणारा हा दिवस आहे. हे सर्वच दिवस आम्ही दिवे लावून फटाके फोडून, गोड धोड खाऊन, नवीन कपडे घालून एकमेकांना भेटवस्तू देऊन साजरे करीत असतो. एकदा एक धनिक माणूस धनिक असून सुद्धा नेहमी दुःखी राहत होता. अनेक वैद्य त्याने केले. अनेक मोठमोठ्या लोकांना त्यांनी आपले दुःख कसे दूर होईल असे विचारले. शेवटी त्याला कोणीतरी सांगितले की तुला जर आनंदी राहायचे असेल तर तू आनंदी माणसाचा सदरा घाल. म्हणजे तू आनंदी होशील. हा धनी माणूस आनंदी माणसाचा सदरा शोधायला लागला. पण आनंदी माणसाचा सदरा शोधायचा म्हणजे पहिले आनंदी माणूस शोधावा लागेल. तो प्रत्येकाला भेटायचा व विचारायचा की काहो तुम्ही आनंदी आहात का? तर प्रत्येकच माणूस त्याला काही ना काही आपले दुःख सांगायचा. शेवटी निराश हताश होऊन हा एका नदीकाठी गेला. तिथे त्याला दिसले की झाडाच्या दाट छायेमध्ये एका मोठ्या दगडावर एक माणूस झोपलेला आहे. हा सुद्धा त्याच्या शेजारी जाऊन बसला. याची चाहूल लागल्यामुळे तो माणूस झोपेतून जागा झाला व याच्याकडे बघू लागला. त्या माणसाने याला विचारले की काय झाले? तुम्ही इथे कसे? तर हा धनिक माणूस त्याला म्हणाला मी आनंदी माणूस शोधतो आहे. सर्व गाव पालथे घातले पण मला आनंदी माणूस कोणी भेटला नाही. शेवटी मी आता गावाच्या बाहेर या नदीकाठी येऊन पोहोचलो आहे. हा धनिक माणूस त्या माणसाला विचारतो की तू आनंदी आहेस का? त्यावर तो माणूस म्हणतो हो मी आनंदी आहे. धनिक माणसाचा आनंद गगनात मावेनासा होतो. त्याला वाटते की आपल्याला आनंदी माणूस सापडलेला आहे. तो त्याला म्हणतो की तुझा सदरा मला देशील का? तर तो मनुष्य म्हणतो की माझ्याजवळ तर अंगात घालायला सदराच नाही. मी असाच उघडाच राहतो. मग त्या धनिक माणसाच्या डोक्यामध्ये प्रकाश पडतो की ज्याच्याजवळ अंगात घालायला सदरा सुद्धा नाही तो माणूस जर आनंदी राहू शकतो तर माझ्याजवळ इतकी काही धन दौलत आहे तर मग मी आनंदी का राहू नये?




# दिवाळी फराळ-एक परंपरा



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**गौरी गणपती, नवरात्र सरले की वेध लागतात दिवाळीचे! अनेकांना अनेक गोष्टींसाठी दिवाळी आवडते. काहीना शाळा, कॉलेजना भरभक्कम सुट्टी असते म्हणून, काहीना, सगे सोयरे भेटतील म्हणून, परदेशस्थ बांधवांना मायदेशी यायचे कारण मिळते म्हणून, तर अर्थात सगळ्यांना मनसोक्त फराळाचा आस्वाद घेता येईल म्हणून! हो, बरोबर.. आता सगळे पदार्थ वर्षभर मिळतात, पण तरी होळीला पुरणपोळी, पाडव्याला श्रीखंड,गणपतीत मोदक तसेच दिवाळीला फराळ हा हवाच! एरवीही खात असलो तरी दिवाळीत हे पदार्थ खाण्याची लज्जत न्यारीच असते.**

मागच्या काही वर्षांपासून नावारूपाला आलेले अनेक गृह उद्योग आहेत, त्यातीलच एक म्हणजे दिवाळीचा फराळ! घरगुती पद्धतीने फराळ बनवून विकणे हा कित्येक गरजु महिलांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. घर चालवण्यासाठी, चार पैसे जमवण्यासाठी, संसाराला हातभार लावावा म्हणून किंवा स्वयंपाकाची आवड असल्यामुळे एक पॅशन म्हणून दिवाळी सुरु व्हायच्या कित्येक दिवस आधी दिवसरात्र खपून रोजगाराच्या आशेने अनेक महिला आपले पाककौशल्य पणाला लावून फराळ बनवतात व विक्रीसाठी बाजारात उपलब्ध करतात. वेगवेगळ्या क्षेत्रात अहोरात्र काम करत असणाऱ्या इतर अनेक महिलांसाठी हा रेडीमेड फराळ म्हणजे वरदानच ठरत आहे. नोकरीच्या ठिकाणी द्यावे लागणार दिवसाचे अनेक तास तसेच दिवसेंदिवस वाढतच असणारी वाहतूक कोंडी यामुळे जाण्यायेण्यात वाया जाणारा वेळ यामुळे इच्छा असूनही घरी जाऊन कंबर कसून फराळाच्या तयारीला लागणे कित्येकांना शक्य होत नाही.

परवाच कुठेतरी वाचले, की दिवाळी सुरू व्हायच्या आधीच निगुतीने फराळ बनवणाऱ्या महिलांबाबत इतरांना प्रचंड आदर वाटतो, पण त्याही पेक्षा फराळ न बनवणाऱ्या बायकांचे त्याहून हजारपट जास्त कौतुक वाटते, कारण त्यासाठी सॉलीड गट्स आणि तूफान आत्मविश्वास लागतो. कारण समोर ताटलीत विकतचे फराळाचे पदार्थ ठेवल्यावर बाहेरचे तर सोडा, पण सगळ्यात आधी त्यांना घरातल्याच अनेक प्रश्नांच्या सरबत्तीना आणि विस्फारलेल्या नजरांना सामोरे जावे लागते. पण काळाची गरज आणि प्रत्येकीच्या आयुष्यातील ' प्रायोरिटीज ' म्हणजेच प्राधान्य क्रम वेगवेगळा असतो, ( आणि तो असावाच ) त्यामुळे बाजारात सहज उपलब्ध असणारा तयार फराळ हा अशा अनेक कुटुंबांसाठी एक उत्तम पर्याय ठरतो. दर दिवाळीला, या फराळाच्या मागणीचा आलेख चढत्या क्रमाने जात असतानाच, या पार्श्वभूमीवर , ज्यांना नसेल आवडत बाहेरचा फराळ त्यांनी "बाहेरच्या फराळाला काय ती चव" असे जाहीर रित्या आपली प्रतिक्रिया नोंदवणे ही नक्कीच स्वागतार्ह बाब नाही. अनेक मालिकांमध्येही असे संवाद अनेकदा म्हंटले गेले आहेत. घरच्या गृहिणी चविष्ट फराळ बनवत असतानाही भर दिवाळीत हॉटेल, रेस्टॉरंट, अगदी पाणीपुरी, वडापावच्या गाड्या गर्दीने ओसंडून वाहत असतात. जसे हे सगळे हॉटेल व्यावसायिक पैसे कमवतायत तशाच याही गृह उद्योग चालवणाऱ्या गृहिणीही फराळ विकून पैसेच कमवतायत की! बरं, हा व्यवसाय करणाऱ्या 99% महिला मराठी आहेत. परप्रांतीय या फराळ बनवणाऱ्या कामात अजून तरी सक्रिय झालेले नाहीत. मग, असे असताना, ज्यात आपला मराठी माणसांचा हातखंडा आहे असा करंजी, अनारसे, चकली, चिवडा , विविध प्रकारचे लाडू, मिठाया असा ' नो जंक ' अस्सल घरगुती दिवाळी मेवा खाऊन खिलवून आपली महाराष्ट्रीयन खाद्य संस्कृतींची परंपरा पुढे नेणाऱ्या मराठी बंधू भगिनींना पाठिंबा देणे, प्रोत्साहन देणे हे कर्तव्यच आहे.

# महाराष्ट्रातील 'लालपरी'ला वाचवा!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात मागील वर्षी ऐन दिवाळीच्या तोंडावर २७ ऑक्टोबरला एस. टी. कर्मचाऱ्यांच्या संपाला सुरुवात झाली. तो ५४ दिवस चालला. या संपाने शंभरच्यावर कर्मचाऱ्यांचा बळी घेतला आहे. यात एस.टी महामंडळाचे आर्थिक कंबरडे मोडले. पण यावर्षी एसटीचा दिवाळीत संप होणार नाही, असे दिसतेय. शिंदे सरकारने कर्मचाऱ्यांच्या वेतनासासाठी तीनशे कोटी व बोनससाठी ४५ कोटींचा आर्थिक निधी दिला आहे. पण यातून एसटीचा प्रश्न सुटलेला नाही. सध्या 'लालपरी' ही व्हेंटीलेटरवर आहे, तिला वाचविण्याचे काम महाराष्ट्र सरकारला करावे लागतील.**

महाराष्ट्रात एसटीने 'गाव तेथे एसटी 'व 'रस्ता तेथे एसटी' हे ब्रीद वाक्य घेवून १ एप्रिल १९४८ ला शहरी आणि ग्रामीण प्रवाशांसाठी सेवा सुरू केली. सुमारे ७४ वर्षे ग्रामीण लोकांच्या मनावर एसटीने राज्य केले. ती गरिबांचे हक्काचे वाहन आहे. आज एसटी सेवा सलाईनवर असल्याचे दुःख होते. राज्यातील ५४ दिवसांच्या संपानंतर एसटी सेवा सुरू झालेली आहे. याचा आनंद वाटतोय! शिंदे सरकारने लक्ष घालत आहे. नुकतेच सरकारने बडतर्फ केलेल्या ११८ एसटी कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच वेतन व बोनससाठी साठी आर्थिक सहाय्य केले आहे. त्यामुळे यावर्षी एसटी कर्मचाऱ्यांच्या घरी दिवाळी साजरी होईल, असे वातारण निर्माण केले गेले आहे, पण पुढे काय? हा प्रश्न कायम आहे. शासनान दिलेली आर्थिक मदत ही तात्पुरती स्वरूपाची केवळ मलमपट्टी करणारी आहे. सद्या एसटी महामंडळ १२ हजार ५०० कोटी रुपये तोट्यात आहे. महामंडळाचा तोटा भरून काढून ते नफ्यात येण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. महाराष्ट्र एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन राज्यापेक्षा तुलनेत ७२ कमी आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यातही वेतन कधी वेळेवर मिळत नाही. त्यात महागाई भत्ता, बोनस आदीचा विचार करणे दूरच आहे. महामंडळ १९९० पासून एकच रडगाणे आहे ते म्हणजे 'तोटा' असल्याचे. देशात राज्य ट्रॉन्सपोर्ट ॲक्ट १९५० नुसार देशात २६ महामंडळे आहेत. राज्य परिवहन मंडळ डबघाईला कसे काय आले? या कारणांचा महामंडळ पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी व राज्य सरकारने कधी गंभीरपणे विचार केला आहे काय? शासनाने एसटीच्या तोट्यातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना सूचविल्या आहेत काय? राज्य एसटी महामंडळाच्या तोट्याची श्वेतपत्रिका तरी काढली गेली काय? एसटी महामंडळ तोट्यात येण्यामागची अनेक कारणे आहेत. त्यात काळ्या- पिवळ्या जीपवाल्यांनी उघडपणे अवैध प्रवाशी वहातूक व्यवसाय सुरु केला. या जीप बस स्थानकाच्या बाहेर उभ्या राहत असत. या पोलिसांवर दवाब म्हणून त्यावर अमूक-तमूक राजकीय नेत्यांचा आशीर्वाद, असे लिहिलेले असायचे. ही अवैध प्रवाशी ज्या मार्गावर धावत असत. त्या मार्गावरील प्रत्येक पोलिस स्टेशनला हप्ता ठरलेला होता. या जीपमध्ये क्षमतेपेक्षा अधिक चाळीस प्रवाशी कोंबड्यासारखे भरले जात असत. या अनेकांनी जीव गमावला लागला. याला अवैध वहातुकीवर राज्य सरकारला निर्बंध घालता आलेले नाहीत. त्यात एसटीचा प्रवास सुरक्षित असतानाही सामान्य लोकांनी एसटीकडे पाठ फरविली होती. त्याला ते सुध्दा तितकेच



जबाबदार आहेत. त्यात पुन्हा भर पडली, ते म्हणजे खासगी ट्रॅव्हल्सची. ट्रॅव्हल्स प्रवासी वहातूक स्पर्धेत एसटी महामंडळाला स्पर्धा करता आलेली नाही. त्यात लांबपल्याच्या प्रवाशी आरामदायी ट्रॅव्हल्सने प्रवास करण्यास पसंती देऊ लागले. या ट्रॅव्हल्स कंपन्या राजकीय नेत्यांच्या, बड्यांचा आहेत. वास्तविक ट्रॅव्हल्स थांबे पध्दतीने प्रवासी वहातूक करता येत नाही. त्यांना विवाह, सहल, पर्यटन आदी ठिकाणी कंत्राटपध्दतीने प्रवाशी नेण्याची परवानगी आहे. पण या ट्रॅव्हल्सवाल्यांनी तर समांतर बसस्थानकच उभारले आहेत. वहातुक कायद्यानुसार ट्रॅव्हल्सवाल्यांना प्रवाशांची यादी करावयची व ती आर.टी ओ.आणि पोलिसांना देणे बंधनकारक आहे. याबाबत उच्च न्यायालयांनी निर्णय दिलेले आहेत. हे नियम चक्क धाब्यावर बसविले जात आहेत. आता सर्रासपणे समांतर खासगी प्रवासी वाहतूक सुरु आहे. नासिक जवळ दि. ८ ऑक्टो. रोजी चिंतामणी कंपनीची यवतमाळ ते मुंबई जाणाऱ्या ट्रॅव्हल्स ट्रकच्या डिझेलवर आदळली, यातून डिझेल उडालेव बसला आग लागली, असे त्यात १२ जण जळून मृत पावले. त्याच दिवशी सप्तश्रृंगी गडावर एसटी बसला आग लागण्याची घटना घडली. पण सुर्देवाने जिवीतहानी झाली नाही. राज्यात एसटी बसच्या अपघाताचे प्रमाण कमी आहे. कारण चालक हे प्रशिक्षित असतात. बसच्या वेगावर मर्यादा असते. तसेच बहुतेक चालक निर्व्यसनी असतात. नांदेड जिल्ह्यात काही वर्षापूर्वी हदगाव डोरला गावाजवळ एस. टी.च्या बसचा अचानक आग लागली होती. त्यात ४५ प्रवाशी जागीच जळून मृत पावले. त्यावेळी तत्कालिन स्व.शंकरराव चव्हाण यांनी बसेच्यावरील बाजूने दरवाजा असावा, अशी सूचना केली होती.पण या बसेसमध्ये आजपर्यंत सुधारणा झालेली नाही. परवा अपघात झालेल्या ट्रॅव्हल्स प्रवासी करण्याची अधिकृत परवानगी होती काय? यावर कोणी बोलत नाहीत. ट्रॅव्हल्सने प्रवासी अपघात विमा काढला होता काय? आर. टी. ओ. कार्यालयाकडून या गाडीची तांत्रिक तपासणी कधी झाली होती? गाडीत प्रवाशी संख्या किती होती? या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे काय? ट्रॅव्हल्सवाले प्रवाशांना वाटेल तर भाडे आकारून ऐन दिवाळीत लुटतात, यावर राज्य सरकारचे नियंत्रण राहिलेले नाही. या अपघाताची शासकीय पातळीवर चौकशी होईल, त्यातून काही निष्पन्न होणार नाही. यात गरीब ट्रॅव्हल्स चालकावर तातडीने कारावाई केली गेली व मालकावर केली गेली नाही. चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या मालकाचे नाव पुढे आले नाही. एखादी मोठी घटना घडल्यानंतरच शासन यंत्रणा जागे होते. मग नवीन नियम केले जातात भविष्यात पुढे काहीच होत नाही. नंतर 'येरे माझ्या मागल्या, असेच होते.

राज्यातील एसटीच्या उत्पन्न वाढीकडे दुर्लक्ष, महामंडळाचा अनागोंदी कारभार, सुट्या पार्टच्या खरेदीत मोठ्या प्रमाणत भ्रष्टाचार, तोट्याचे मार्ग, नादुरूस्त गाड्यांचे वाढते प्रमाण. यात राज्य शासनाचा प्रवाशी कर म्हणजे हा दुष्काळात तेरावा महिना समजला जातो समितीच्या एका अहवाल म्हंटले, आंध्रप्रदेश, गुजरात, तेलंगणा, कर्नाटक राज्याचा प्रवासी कर हा ५.५ ते ७.५ टक्के इतका होता. महाराष्ट्रात प्रवासी कर १७.५ टक्के इतका आहे. राज्य परिवहन महामंडळाने र १९६० पासून सुमारे २० हजार कोटीचा प्रवासी कर भरलेला आहे. त्यात डिझेलवरचा कर, टोल कर आदी ६०० कोटी रुपयांचा कर राज्य शासनाला दिलेला आहे. महामंडळ पंधरा वर्षापूर्वी एक हजार कोटी तोट्यात होते.करोनाकाळात २०२०-२०२१ यात भर पडली सुमारे ६ हजार कोटीचा फटका. सतत तोट्यामुळे महामंडळाकडे इंधन खरेदी व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी पैसे नव्हते. तीच दयनीय परिस्थिती आजही आहे. त्यामुळे मंडळाला राज्य शासनाकडे आर्थिक मदतीची याचना करावी लागत आहे. महामंडळ किती दिवस याचनेवर चलणार आहे. महामंडळ स्वतः आर्थिक बळावर कधी चालणार की नाही?

राज्यातील महाविकास आघाडी सरकारने तर एसटी कर्मचाऱ्यांच्या पोटावर अन् पाठीवर मारले! या सरकारला या एसटीचा संप मिटविता आला नाही. माणसाला पोटाची भूक लागली की, हिंसक, आक्रमक, गुन्हेगार होतो. एसटीचे कर्मचारी पोटाची मागणी करत होते, त्यासाठी रोज एक मरत होता, पण असंवेदनशील सरकारला दया आली नाही. त्यामुळे हे कर्मचारी अक्रमक झाले, ते रा.काँ.चे नेते शरद पवारांच्या निवासस्थानवर चालून गेले. त्यांनी भावनेच्या भरात चप्पल, दगडफेक केली. त्यांच कृत्याचे समर्थन होऊ शकत नाही. पण कर्मचारी अतिरेकी नक्षलवादी नव्हते हे सत्य आहे. ते पवारांचे राजकीय कार्यकर्ते अथवा गुन्हेगारही नव्हते. त्यांचा केवळ पवारांच्या भूमिकेवर राग होता. त्यांनी पवारांची कन्या खा. सुप्रिया सुळेवर हल्ला केला नाही. पण पवारांनी लक्ष घातले असते या संपातून मार्ग निघाला असता. एरव्ही सल्ला सर्वांना देणारे शरद पवार एसटी संपाबाबत मौन पाळून होते. राज्यात अनेक आंदोलनात, जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्यात आले त्यांचेवरचे गुन्हे मागे घेतले. पण एसटीच्या बडतर्फ कर्मचाऱ्यांनाना सेवेत घेतले, तर त्यात बिघडले कोठे? पण काही पत्रकाराला सरकारचा निर्णय रूचलेला नाही, त्यांनी यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या संपात एसटीचे शासनात विलिनीकरणाची ही प्रमुख मागणी होती. ती अवास्तव आणि व्यवहारिकदृष्या अयोग्यच होती. तरीही या मागणीचा आग्रह धरला गेला. त्यात भाजपाने समर्थन देऊन तेल टाकले. त्यामुळे संपाला राजकीय स्वरूप आले. शासन विलिनीकरणाची प्रक्रिया सोपी नाही. रोड ट्रॉन्सपोर्ट ॲक्ट हा केंद्र सरकारचा आहे. यात महामंडळ बरखास्त करून नव्याने प्रक्रिया सुरू करावी लागते.यात शासनाला करोडो रूपायाचा आर्थिक बोझा उचलावा लागतो असता. ही बाब अशक्य होती. एसटीच्या कर्मचाऱ्यांनी आग्रह धरु नये, असे अनेकांचे मत होते. पण कोणी ऐकण्याची मनः स्थितीत नव्हते. यात भरडले गेले सामान्य कर्मचारी, त्यांचे कुटुंब.

मुंबईत साठच्या दशकात कापड उद्योग भरभरटील आलेला होता.यात १९८२ मध्ये गिरणी कामगारांचा संप झाला. हा संप इतका ताणला गेला की, शेवटी कापड उद्योगालाच कायमचे टाळे पडले.यात कामगार, कुटुंब देशोधडीला लागले. या बंद कापड गिरण्यांची जागा काही राजकीय लोकांनी विकत घेतल्या आहेत. कापड कामगारांच्या संपाचा इतिहास वाचला तर अंगावर शहारे येतील.

महाराष्ट्रा पेक्षा तेलंगणातील रस्ते व बसेसचा दर्जा चांगला आहे.तेथे प्रवाशी खाजगी बसची वाट पहात बसत नाहीत. प्रवासी त्या बसने प्रवास करणे टाळतात.बस चालक,वाहक हे दोघे प्रवासी वाढण्याबाबत अतिशय काळजी घेतात. बस प्रत्येक बस थांब्यावर थांबते. प्रवाशांनी हात दाखविला की बस थांबते. बस चालक व वाहक कुरकुर करत नाहीत. बसस्थानकात प्रवासी असो, नसो बस स्थानकात जाणारच. तेलंगणा राज्यातील बस चालकांना विचारले, तुम्ही बस कोठेही थांबवता? त्यावर तो म्हणाला 'ते आमचे अन्नदाता आहेत! त्यांची सेवा केल्याशिवाय आमचे पोट भरणार नाही', ही त्यांच्यात भावना आहे. तशी महाराष्ट्रातील एसटी चालक व वाहकात प्रवाशांबाबत अशी भावना आहे काय? तेलंगणा, कर्नाटक राज्यातील लांबपल्याचा गाड्यांचा दर्जा उत्तम आहे. या उलट महाराष्ट्रातील एसटी बसेस खुळखुळ्या झालेल्या आहेत. बसस्थानकाची अवस्था दयनीय आहे, प्रवाशांचे बाकडे मोडलेले, घाणीचे साम्राज्य, दिवे व पंखे बंद, पिण्याची पाणी नाही, स्वच्छतागृहात चांगले नाही. महाराष्ट्रात लांबपल्याचा बसेस दर्जा आंध्र प्रदेशापेक्षा चांगला असावा, असे मत स्व. शंकरराव चव्हाण यांनी पस्तीस वर्षापूर्वी बिलोली बसस्थानक उद्‌घाटन प्रसंगी व्यक्त केले होते. पण आजपर्यंत एसटीची दर्जा सुधारलेला नाही. तेलगंणातून येताना खड्डेमय रस्ते लागले की, महाराष्ट्र सुरू झाला, असे राज्याची ओळख आहे. राज्यातील लालपरी बंद झाली तर ग्रामीण जनतेचे अतिशय हाल होतील.लालपरी ग्रामीण भागाची जीवनदायिनी आहे. खासगी वहातूक कंपन्या ग्रामीण भागात सेवा देणारच नाहीत. तेंव्हा महाराष्ट्रातील ही लालपरी वाचली पाहिजे. त्यासाठी राज्य शासन, महामंडळ आणि कर्मचारी यांनी सामुदायिकपणे जबाबदारी घेतली पाहिजे. त्यासाठी उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे, प्रवासी संख्येत वाढ करण्यावर भर देणे, नवीन बससे घेणे, आर्थिक नियोजन व काटकसर करणे, राज्य शासनाने खासगी प्रवासी वहातुकीवर निर्बंध घालणे, आर्थिक मदत देणे, प्रवासी कर कमी करणे आदीवर भर दिला,तरच महाराष्ट्राची ही लालपरी वाचणार आहे.

# भाक्रा धरणाचा हिरक महोत्सव



किशोर सांगळे
संपर्क क्र. ७३८५९४५९५६

आधुनिक केसरी

**२२ ऑक्टोबर १९६३ रोजी पंडित नेहरुंच्या हस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आला. हा प्रकल्प म्हणजे 'देशाच्या प्रगतीचे प्रतीक' असे गौरवोद्गार पंडितजींनी काढले. या प्रकल्पामुळे हरयाणा राज्यातील सर्व गावांना वीज उपलब्ध झाली, तसेच पंजाब व हरयाणा या दोन्ही राज्यांची कृषिक व औद्योगिक प्रगती शक्य झाली. राजस्थान राज्य व केंद्रशासित प्रदेश दिल्ली या दोघांनाही या प्रकल्पामुळे वीज उपलब्ध झाली आहे. हे भाक्रा नांगल धरण शनिवारी ६० वर्षांचे झाले आहे.**



स्वतंत्र भारतात बांधण्यात आलेले हे पहिलेच धरण होय.हे धरण हिमाचल प्रदेशातील पंजाब सीमेजवळ नांगल गावापासून १३ किलोमीटरवर वसले आहे. सतलज नदीवर बांधण्यात आलेले हे धरण २२५.५५ मीटर उंच आहे. धरणाचे बांधकाम १९६३मध्ये पूर्ण झाले आणि २२ ऑक्टोबर १९६३ रोजी त्या वेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ते राष्ट्राला अर्पण केले. पंडित नेहरू यांनी या प्रकल्पाला सुरुवात झाल्यावर प्रकल्पाला १३ वेळा भेट दिली होती. चीनबरोबर करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण पंचशील करारासंबंधीची पंहित नेहरू यांनी चीनचे तत्कालीन पंतप्रधान शाव एन लाय यांच्यादरम्यान भाक्रा धरणाजवळच झाली. धरणाच्या जलाशयाला शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंग यांच्या नावाने ओळखले जाते. जलाशय सुमारे ९६.५६ किलोमीटर असून, ते सुमारे १६८.३५ स्क्वेअर किलोमीटर क्षेत्रावर पसरले आहे.पंजाब आणि हरियाणातील सुमारे १३५ लाख एकर जमिनीचे संपादन धरणासाठी करण्यात आले. धरण बांधण्यासाठी २४५ कोटी २८ लाख रुपये खर्च आला.हरितक्रांतीसाठी धरणाचे पाणी उपयुक्त ठरले होते.राजस्तानच्या काही भागांतही धरणाचे पाणी पोहोचते. धरणाच्या दोन वीज निर्मिती केंद्रांमधून १,३६१ वीजेचे उत्पादन होते. ही वीज पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि चंडिगड येथेही पोहोचते. हिमाचल प्रदेशातील भाकरा नांगल धरण हे भूकंपप्रवण क्षेत्रात येते. या भागाच्या पाहणीत हे लक्षात आल्यावर धरण बांधताना हार्वे स्लोकम या स्थापत्यशास्त्रज्ञाने त्या भागातील फुटके-तुटके खडक व माती बाजूला करून तेथे लाखो टन कॉंक्रीटची भर घातली व मगच धरण बांधले. अशा या धरणाला राष्ट्राला अर्पण करून शनिवारी ६० वर्ष पूर्ण झाली.

# शिरूरमधील जांबूत गावात बिबट्या जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**शिरूर :** जांबूत भागातील जोरी वस्ती येथे वनविभागाकडून लागण्यात आलेल्या पिंजऱ्यात अखेर बिबट्या जेरबंद झाला आहे. बिबट्याची रवानगी माणिकडोह येथील बिबट्या निवारण केंद्रात करण्यात येणार असल्याची माहिती शिरूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनोहर म्हसेकर यांनी दिली. जांबूत भागांत गेल्या काही दिवसांत बिबट्याचा वावर वाढला असून, दहा दिवसांपूर्वी जोरी वस्ती येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एका महाविद्यालयीन तरुणीचा मृत्यू झाला होता. जोरी वस्ती येथे राहणारी पूजा भगवान नरवडे ही १२ ऑक्टोबरला बिबट्याने केलेल्या हल्लात ठार झाली होती.



# दीपावली साजरी करताना



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

आपल्या देशातील दीपावली हा अतिशय महत्वाचा सण. हा सण जणू एका पॅकेजच्या स्वरूपात येतो. धनत्रयोदशी, लक्ष्मी पूजन आणि भाऊबीज या सणांसोबत संपूर्ण महिना एखाद्या उत्सवाच्या स्वरूपातच निघून जातो. या सणाचे पौराणिक आणि सामाजिक महत्व आपल्याला खूप चांगल्या पद्धतीने माहित आहे मात्र या गोष्टीचे दुःख होते की, कित्येक वेळा सणांचे नकारात्मक चित्रण आपण आपल्या मनात करून बसतो. न केवळ आपण नकारात्मक चित्रण करून बसतो तर याला आपल्या जीवनात अंगिकारून दूस-यांचे नूकसान करण्यात प्रमुख भागिदारही बनतो. दीपावलीच्या वेळी जे सण येतात त्यांची नकारात्मक व्याख्या आणि चूकीच्या परंपरा आपल्यासाठी कशा प्रकारे हानीकारक असतात हे समजून घेणे खूप आवश्यक आहे.

## वस्तूंची खरेदी करताना

या सणाच्या वेळी सर्वात अगोदर येणारा सण म्हणजे धनत्रयोदशी. या वेळी लोक नव्या वस्तूंची खूप मोठया प्रमाणावर खरेदी करतात. बाजारपेठ ही भरलेली असते, वेगवेगळ्या प्रकारच्या भेटवस्तू खरेदी केल्या जातात. अनेक ऑनलाईन संकेतस्थाळांवर वेगवेगळ्या प्रकारच्या ऑफर्स दिल्या जातात. एकूण ग्राहकांना खरेदी करण्यासाठी जबरदस्त पद्धतीने प्रोत्साहित केले जाते. ठिक आहे, खरेदी ही केलीच पाहिजे मात्र हे आपल्याला माहित आहे का की, अनेक धूर्त व्यापारी या सणांच्या मानसिकतेचा फायदा उठवतात. ही लोक खाद्यपदार्थांमध्ये केवळ भेसळच करत नाहीत तर लोकांचे आर्थिक नुकसान करून त्यांच्या आरोग्याला हानी पोहचवितात. खव्या मध्ये होणारी भेसळ आपल्याला माहित आहेच. एवढंच नाही तर बाजारात चांदीचे नकली शिक्के सुद्धा विकले जात असल्याची बातमी एका न्युज चॅनलने दाखविली होती. आपल्या सराफामार्फत आपल्याला शुद्ध चांदीच्या नावावर नकली माल लादला जात असेल तोही असली चांदीची किंमत वसूल करून ज्यात ५० टक्के पेक्षा कमी चांदी आहे तर खरेदीदारांची किती लूट होत असेल. या न्युज चॅनलने पडताळणी करण्यासाठी या चांदीच्या शिक्क्यांचे परिक्षण केले. आपल्याला विश्वास बसणार नाही ५ मागे ४ शिक्के नकली निघाले.

हे उघड आहे की, आपल्याला काही ना काही खरेदी करायची घाई आहे, दुकांनांमध्ये खूप गर्दी आहे तर याचा गैरफायदा उठवणारेही हजारो लोक आहेत. अशात आपल्याला सल्ला आहे की, आपण खरेदी करताना खूप सावध रहावे. जर आपल्याला किमती वस्तू खरेदी करावयाची आहे तर ती धनत्रयोदशीला खरेदी करू नये. आपण ही खरेदी धनत्रयोदशीनंतर पूर्ण चौकशी करून करू शकता. या सणाच्या वेळी अनेक कंपन्या ऑफर्स देतात किंवा खरेदीवर कूपन देतात मात्र आपण विना काही चौकशी करता खरेदी केल्यास आपल्याला नकली वस्तूही दिली जावू शकते. या व्यतीरिक्त दीपावलीला महागड्या भेटवस्तू ज्यात कधी-कधी उंची मद्याचाही समावेश असतो यांची देवाण-घेवाण निसंदेह चूकीची पंरपरा आहे. या गोष्टी आपण टाळल्या पाहिजेत.

## चीनी वस्तूंबाबत

दीपावलीशी संबंधीत चीनी वस्तूंच्या खरेदीचा सोशल मीडीयावर आजकाल खूप विरोध केला जात आहे. चीनी वस्तू भारतीय वस्तूंच्या तूलनेत स्वस्त असल्याने चीनी झालर, फटाके, मिठाई आणि कपडयांनी भारतीय बाजारपेठ व्यापली आहे. व्यापारात चीनने आपले पाय मजबूतीने रोवल्याने आपला पैसा चीनमध्ये जातो आणि आपल्या दुर्दैवाने चीन याच पैशाने पाकिस्तानला भारतात दहशतवाद पसरविण्यासाठी अप्रत्यक्षरित्या मदत करतो. अशा प्रकारे आपण चीनी वस्तूंची खरेदी करून अप्रत्यक्षरित्या दहशतवादाला हातभार लावतो. यासाठी होईल तेवढ चीनी वस्तूची खरेदी करणे आपण टाळले पाहिजे त्याऐवजी भारतीय लघू उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे मग या वस्तू काही प्रमाणात महागड्या का असेना.

## फटाक्यांच्या बाबतीत

खरेदीच्या नंतर आपल्या स्वास्थ्याच्या दृष्टीने बघीतले तर देशातील अनेक मोठया शहरात वायू प्रदूषणाचा धोका वाढलेला आहे तोही ठिक दीपावलीच्या अगोदर. आपल्याला हे चांगले माहित आहे की, मोठया प्रमाणावर फटाके वाजवल्याने कशा प्रकारे वायू प्रदूषण होते. हे प्रदूषण वृद्ध आणि नवजात बालकांसाठी एक प्रकारचे विषच आहे. आता या बाबतीत लोकांमध्ये काही प्रमाणात जागरूकता निर्माण झाली आहे तरीही याबाबतीत खूप काही करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या आसपासच पिकांची कापणी होते. पिकांची कापणी झाल्यानंतर राहिलेले अवशेष उघड्यावर जाळल्याने जो धूर हवेत मिसळतो त्यामुळे अनेक प्रकारचे



आजार होतात, अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. अशात ऐन दीपावलीच्या अगोदर वायू प्रदूषण धोकादायक स्तरापर्यंत पोहचते आणि जेंव्हा दीपावलीला फटाक्याच्या धूराने आकाश झाकून जाते तेंव्हा परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर होवून जाते. श्वसनाचे आजार असणा-या रुग्णांसाठी हा धूर जीवघेणा ठरू शकतो. खरंतर या गोष्टी अनेक वर्षांपासून सांगितल्या जात आहेत, शोध केला जातो, सर्व्हे केला जातो, शोध निबंध बनवला जातो मात्र तरीही आपले केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच वागण भावशून्य आहे. शेवटी याची जबाबदारी घेणार तरी कोण ? अशात आपण या भारताचे नागरिक म्हणून वायू प्रदूषण कमी करण्यासाठी फटाक्यांचा खूप नियंत्रीत वापर केला पाहिजे. अस म्हणन योग्य ठरणार नाही की, दीपावलीचा सण आहे आणि आपण फटाके फोडू नयेत, मात्र केवळ औपचारिकता म्हणून खूप कमी प्रमाणात ! अगोदरच शहरात वाहनांची संख्या खूप वाढली आहे त्यात फटाके फोडल्याने आरोग्याशी संबंधीत किती प्रश्न निर्माण होतात आपण याची कल्पना नाही करू शकत. काही लोक या गोष्टीचा विरोध करतात किंवा याला अन्य धर्माशी जोडतात आणि म्हणतात की आपण भरपूर फटाके फोडले पाहिजेत, हे आपले स्वातंत्र्य आहे. ठीक आहे याला नाकारले नाही जावू शकत मात्र आपण कोण्या लहान मुलाच्या दृष्टीने, कोण्या वृद्धाच्या, हृदय रोगाच्या रुग्णाच्या दृष्टीने त्याच्या स्वास्थ्यावर फटाक्यांच्या धूराचा होणारा परिणाम पाहिले तर एक वेळेस आपल्याही मनात हा विचार आल्याशिवाय राहणार नाही की, आपण फटाके का फोडत आहोत ? वास्तविकदृष्ट्या आपण एक हजारापासून दहा हजार रुपयांपर्यंत जे पैसे फटाक्यांवर खर्च करणार आहोत त्यातून कोणा गरजवंताची मदत नाही का करता येवू शकत ? खरंतर फटाके फोडणे म्हणजे पैशाचा सरळ-सरळ अपव्यच आहे, आरोग्याचे प्रश्न निर्माण करणारा आहे आणि यातून अनेक वेळा दूर्घटनाही होतात जसे आग लागणे, डोळ्यांना दूखापत होणे, भाजणे इत्यादी. तसंतर सणांच्या बाबतीत सकारात्मक बाबी खूप आहेत. खासकरून दीपावलीच्या संबंधीत अनेक लेखांमध्ये या पर्वाचे अनेक फायदे आपण वाचले असतीलच, मात्र या जगातील प्रत्येक बाबीत काही वाईट गोष्टीही असतात ज्यात आपण सुधारणेकडे अग्रेसर होवू शकतो.

## जुगार खेळणे टाळा

दीपावलीच्या दिवशी जुगार खेळण्याची प्रथाही आपल्या समाजात काही ठिकाणी आहे. काही लोक असा तर्क देतात की, जर आपण या दिवशी जुगारात जिंकलो तर पूढे नशीब खूप साथ देते. यामुळे अनेक ठिकाणी कवडी, पाश्यांसोबत अनेक प्रकारचे पंरपरागत आणि आधुनिक प्रकारचे जुगार खेळले जातात. जुगार आणि त्याच्या परिणामाबद्दल जास्त काही बोलण्याची गरज नाही कारण याचा परिणाम काय होतो ते महाभारतात खूप चांगल्या पद्धतीने सांगितले आहे. अनेक शकुनीमामा सारखे जुगारी आपल्या कपटी डोक्याने कित्येक लोकांना पशू बनविण्याचे कार्य करित आले आहेत. यापैकी ३५ टक्के लोक केवल शुभ शकुन म्हणून जुगार खेळतात तर उर्वरित १० टक्के लोक शकुनीमामा आणि युद्धीष्टीरच्या जुगारासारख खतरनाक जुगार खेळातात जिथे आर्थिक नुकसानीशिवाय काही हाती येत नाही. तसं बघितल तर सट्टेबाजी हा सुद्धा जुगाराचे आधुनिक रूप आहे आणि जुगाराच्या विभिन्न वाईट गोष्टींना दूर करण्यासाठी सामाजिक जागरूकता करणे अत्यंत गरजेचे आहे. जुगार हा कायद्यानेही गुन्हा आहे. भलेही याद्वारे काही अवैध्य कमाई होत असेलही मात्र आहे शेवटी वाईटच. जर आपण वाईट गोष्टींपासून दूर राहिलो, सावधगिरीने खरेदी केली, खूप फटाके फोडून वायू प्रदूषण केले नाही तर काही कारण नाही की, आपले हे सण सामाजिक समरसता आणणार नाहीत, सुख-समृद्धी आणणार नाहीत, आपल्यासाठी उज्वल भवितव्याची आशा निर्माण करणार नाहीत. तर चला दीपावलीत आपण या वाईट बाबींपासून दूर राहू, सावधान राहू तेंव्हाच ख-या रूपाने लक्ष्मी, गणेश आणि सरस्वतीचे आपण पूजन करू शकू आणि ख-या अर्थाने सणांचा अर्थ समजू शकू.

# अकलेचा धूर, पैशांची राख

आधुनिक केसरी

प्रिय तरुण मित्र-मैत्रिणींनो, दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' याच्या उंबरठ्यावर तुम्ही उभे आहात. शरदऋतूच्या मध्यावर आश्विन आणि कार्तिक यांच्या संधीकाली दशदिशा उजळून टाकणारी दिवाळी म्हणजे दिव्यांचा उत्सव. सुमारे २५०० वर्षांपूर्वी सुरु झालेल्या या सणाला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व आहे. प्रकाशाचा, आनंदाचा, समाधानाचा, समृद्धीचा उत्सव म्हणजे दीपावली, अशी ही दिवाळी म्हणजे फटक्यांचा उत्सव कशी झाली? जे चालू आहे ते बरोबर का चूक ?

प्रश्न ऐकून बाजूला दिवाळीत अटमबॉम्ब फुटावा आणि दचकावे, तसे दचकलात ना ? स्वाभाविकच आहे. कारण दिवाळी हा आज प्रामुख्याने धडामधूम आवाजाचा उत्सव झाला आहे. वसुबारसेपासून भाऊबीजेपर्यंत पाच-सहा दिवस चालणारा हा सण. पणत्या उजळावयात, आकाशकंदील बांधावेत, नवे कपडे घ्यावेत, मित्रांच्या समवेत फराळाचा आनंद लुटावा, घरापुढे रांगोळ्या काढाव्यात, शुभेच्छा पत्रांनी सर्वांना आपले शुभचिंतन पोहोचवावेत; या आनंदी सोहळ्याचे नाव दीपावली. धन, आरोग्य, शांती मिळवण्यासाठी प्रकाशदेवतेची पूजा करण्याचा हा सण. या सर्वांत फटाक्यांनी पुढे कधीतरी घुसखोरी केली आणि कानाचे पडदे फाडून टाकणाऱ्या आवाजाचा हा आनंद (!), ही आता काही दिवाळीचीच मक्तेदारी राहिलेली नाही. लक्षावधी लग्नांत आणि तेवढ्याच मोठ्या संख्येने होणाऱ्या निवडणूक अथवा सामान्यांना निकालात फटाक्यांची 'दे दणादण' आता अपरिहार्य झाली आहे. एकट्या पुण्यात दिवाळीत दहा कोटींचे फटाके उडवले जातात. भारतात केवळ दिवाळीचा विचार केला, तर हा आकडा पाचशे कोटींपर्यंत जातो; आणि लग्ने, निवडणुका यांतील आवाजी आनंद लक्षात घेतला, तर अकलेचा धूर आणि पैशाची शब्दशः राख करणारा हा आनंद (!) प्रदर्शनाचा मार्ग काही हजार कोटींच्यात पोहोचतो. दिवाळीच्या दारूकामात विविध विविध प्रकार असतात. त्यांतील अनेक मन मोहून टाकणारे असतात, तरीही थोडीबहुत हानीच करणारे असतात. मात्र, फटाके आणि अटमबॉम्ब यांची गोष्टच वेगळी. त्यांच्यामुळे फक्त तोट्यांची मालिकाच उभी राहते. आवाजाची पातळी साठ डेसिबलच्यावर गेली की माणसाला त्रास होतो. सुटळी बॉम्ब, डांबरी माळा यांचीदेखील पातळी



नेहमीच शंभरच्या वर असते. या ध्वनीप्रदूषणामुळे रक्तदाबात वाढ, चीडचीड, मानसिक ताण, श्रवणदोष इत्यादी दुष्परिणाम संभवतात. रात्री-अपरात्री उडालेल्या फटक्याने निद्रानाश होतो. लहान मुले, वयोवृद्ध रुग्ण यांचा जीव घाबरतो. अभ्यासात व्यत्यय येतो. अनेक पशुपक्षी घाबरून सैरावैरा पळताना मृत्युमुखी पडतात. वाहन चालवणारी माणसे दचकून अपघात होतात. फटाक्यांतील रसायनांमुळे कार्बन मोनोक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड, माग्नेशियम पेंटाक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड इत्यादी विषारी वायू व माग्नेशियम, सल्फर, फोस्फरस, कार्बन ट्रायनायट्रोटोल्यून इत्यादींच्या धनकणिका वातावरणात मिसळतात. त्यामुळे व विषारी वायूंमुळे दमा, खोकला, अलर्जी, डोकेदुखी, दृष्टी मंदावणे, त्वचारोग, कर्करोग, वाढता रक्तदाब, मतीमंदत्व, मज्जातंतूवर परिणाम यांपैकी काहीही होऊ शकते. तात्पुरता क्षणिक आनंद मिळवण्यासाठी जाणूनबुजून आजारांना निमंत्रण दिले जाते. फटाके उडवणे म्हणजे आगीशी खेळच असतो. फटाक्याने आग लागणे, भाजणे आणि मालमत्तेची व जीविताची हानी होणे या सर्व गोष्टी प्रतिवर्षी वाढत्या प्रमाणावर होत आहेत. फटाके करण्यासाठी कागद वापरतात, त्यासाठी हजारो झाडे तोडली जातात. फटाके फोडल्यावर कागदाच्या चिंध्या होतात, तो जळतो. म्हणजेच हजारो वृक्षांची कत्तल करून पर्यावरणाची हानी होते. फटाक्यांच्या निर्मितीमागील करूण कहाणी आपण समजून घेतली ,तर वातीला उदबत्ती लावताना तुम्ही बहुसंख्य तरुण मंडळी दहा वेळा विचार कराल. *तुमच्या कथित आनंदासाठी बहुसंख्य बालकामगार फटाक्यांच्या कारखान्यात राबत असतात. छोटया कोंदट खोल्या, शोर्टसर्किट टाळण्यासाठी विजेचा वापरच रद्द. वीज नसल्याने मशीन नाहीच; तर पंखा कुठला ? सूर्योदयाला यायचे, सूर्यास्ताला जायचे. एकमेकांशी न बोलता बारा ते चौदा तास मुकाट काम करायचे. एवढ्या वेळात एक हजार फटाक्यांच्या १५-१७ माळा होतात. एका माळेची मजुरी रुपये तीन. दिवसाला अवघे ४०-५० रुपये. लवंगीसारख्या छोटया फटाक्याच्या लढी तयार करण्यास लहान नाजूक हातांची गरज; म्हणून मुले अगदी कोवळ्या वयातील. रजा, सवलती, सुरक्षिततेचे नियम कशाचाच पत्ता नाही. जेवायची वेळ काम झाल्यावर. तरुण मित्रांनो, बालकामगार कायद्याने हा सर्व गुन्हा आहे. देशाची घटना सांगते, या मुलांना सर्व ती मदत देऊन शाळेत पाठवा; पण प्रत्यक्षात आपली दिवाळी रंगीबेरंगी आतषबाजीची आणि मोठ्यातल्या मोठ्या धुमधडाक्याची व्हावी यासाठी आपण या वास्तवाकडे साफ डोळेझाकच करत आहोत. नव्हे, त्याला हातभार लावत आहोत. फटाक्यांच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाला कितीतरी पर्याय आहेत. मात्र, आपण स्वतःही समजून घ्यायला हवे. आपल्या मित्रांना, घरातल्या भावडांना पटवून द्यायला हवे. फटाके न फोडल्याने वाचलेल्या पैशातून छान छान असे खूप काही करता येईल. धैर्य, चतुरपणा, हुशारी, प्रामाणीकपणा अंगी येण्यासाठी *गोष्टींची पुस्तके घेता येतील. विज्ञानाचे खेळ घेता येतील. चमत्कार शिकता येतील. मुलांना खूप छान कागद, पेन्सील, रंग देऊन आकाशकंदिलापासून ओरिगामीपर्यंत बरेच काही करता येईल. किल्ले बांधता येतील, सहल काढता येईल आणि हो याचबरोबर तुमच्यातील कळवळ्याचा माणूस जर जिवंत असेल ना, तर ज्यांच्या जीवनात ही छान छान दिवाळी कधी येतच नाही ते बुटपोलिश करणारे, हॉटेलमध्ये काम करणारे, कागद भंगार गोळा करणारे, दुर्दैवाने मुकबधीर, अपंग, निराधार बनलेले तुमचे छोटे छोटे भाऊ बहिण कोठेही भेटतीलच. त्यांच्याही जीवनात दिवाळी उजळावी म्हणून फटाक्यांच्या वाचलेल्या पैशातून काही करू शकलात ना, तर त्यासारखी आनंदाची दुसरी गोष्ट नाही.

फटाके विरोधी अभियान लेख
डॉ. नरेंद्र दाभोलकर

## भाऊबीज



ओढ लागली मनाला,दिवाळीच्या सणाला,
तु ये रे बंधुराया, या बहिणीला नेयाला... ॥धृ॥

गरिबीचे बालपण ते दुःखात आपले गेले,
रुढी परंपरेने आपणास दूर केले...२
लागलेत नयन माझे...२ तुझी वाट ती
पह्याला... ॥१॥

ते खेळणे बागडने,ते रुसणे आणि रडणे,
आठवते मज आजही फुलपाखरा सम उडणे...२
नाही आज काही बहिणी...२ मजपाशी तुज
देयाला... ॥२॥

घेऊनी पंचाआरती तुजला मी ओवळीन,
तुझ्या सुखाची देवाला, भीख मी मागिण...२
का लागला उशीर...२ भावा तुला येयाला... ॥३॥

बेरोजगारी पायी झालोया मी हताश,
नव वर्षाचा हा सण ही मज वाटतो उदास...२
नाही तो पैसा-अडका...२
साडी-चोळी ही घेयाला...
दुबळा मी तुझा वाल्मिक...२ येऊ कसा
नेयाला... ॥४॥

शाहिर वाल्मिक फाजगे खेडगावकर
(मो. ८६००११४१९३)

## दिवाळीचा सण

दिवाळीचा सण
आनंदाची उधळण
स्वागतास सज्ज
दारी तोरण

दिवाळीचा सण
पहाटे मंगल स्नान
सुगंधी तेल उटणे
प्रसन्न करी मन

दिवाळीचा सण
उजळले तन मन
मनोभावे करीती
घरोघरी लक्ष्मीपूजन

दिवाळीचा सण
बहीण बसली नटून
भावाला ओवाळायला
आतुरले किती मन

दिवाळीचा सण
प्रेमाची देवाण-घेवाण
दिव्यादिव्यातून
एकतेची शिकवन

रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. 9011559106



## दिपावली

दिपावली सण आला आनंदाचा
रोषणाई दिव्यांची करु
घर सजवू फुलाफुलांनी
समाधानाने घर भरु....१

धनतेरस दिवशी धनाची पूजा
येईल मग सुखसमृद्धी घरा
फराळाचे पदार्थ छान
नात्यातील गोडवा टिकवून
धरा..२

नरकचतुर्दशीच्या दिवशी
पहाटेच चतुर्भुज होऊ
दारी सडारांगोळी काढू
एकात्मतेचे रंग त्यास देऊ....३


लक्ष्मीपुजनास लक्ष्मीचा मान
असतो फराळाचा प्रसाद
धुपदिप लावूनी करतात
गायीलाही देतात पुरणपोळी
प्रसाद...४

दिपावलीचा पाडवा गोड होतो
पत्नीच्या तो हक्काचा असतो
प्रेमाने पतीचे मिळताच गिफ्ट
कामाचा शिणवटा दूर पळतो...५

बहिणभावाचा सण मायेचा
अतुट नात्यातील बंधनांचा
ओवाळूनी बहिण भावाला
मेळ घालते मनामनाचा..६

सीमा मंगरूळे तवटे,
वडूज सातारा

## घरीदारी



आता घरीदारी वाळवंट
भर दुपारी तापलेले
रस्त्यावर नित्याचेच तेच
काटे ओळखीचे चिखलात
लपलेले.
म्हणून घरादारात विशेष
फरक वाटत नाही.
सूर्य मावळला तरी पावलं
घराकडे वळत नाही.
आता चीड येतेय
या बहुरूपी जगाची अन
गोलमोल माणसांची.
सारेच पाप करण्यात
एक दुसऱ्याचे बाप पाहून
वाटते की मराठी मातीलाच
काहीतरी शाप आहे.
इथं कितीही चांगलं वागा
तरी कुत्र्याच्या शेपटीचे
त्रिकोणी माप आहे
खेकड्यांच्या नांग्याना बराच
वाक आहे.
इथल्या इंगळयांच्या
नांग्यामध्ये हजारो साप
असूनही त्या ठेचनारा
कोणीही जन्मला नाही
हा तर माणूसकीला लागलेला
अभिशाप आहे.
ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो.९४०३३८४८८९

## भाऊबीज...!

सनई-चौघडा वाजे
अभ्यंग स्नानात
सारवण झाले रांगोळी ही प्रहरात,
तुळशी नववधूप्रिया हसे गालात
म्हणती, मानसवांधी " वर "
शोधण्यात.
कंपाळी कुंकू सदैव सौभाग्याची
लिला दिवाळीच्या पंच दिस
आधी भाऊ आला,
ओढ लागे बघण्या भाऊ-
आईबापाला साऱ्या आठवणीने
डोळा भरूनी आला.
भाऊबीजेच्या साऱ्या पवित्र
बंधणात सुख-दुःख सारे
विसरूनी या सणात,
फटाके ही वाजती जोमाने
अंगणात लक्ष्मी वसे पणत्यांच्या
लखलखाटात.
सरस्वतीने घातला शृंगांराचा
साज पूजनाच्या वेळी लक्ष्मी
आली या घरात,
ओवाळीते भाऊराया माऊलीच्या
अंगणात दीपावली आली या
घेऊनी भाऊबीज...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.



## खंत

वाती दुरावलेल्या पणती उदास आता
काळोख व्यापलेला छळतात भास आता

लुटण्यास बाग माझी का जोर त्या हवेला ?
गवतास रंग नाही सारे भकास आता

साऱ्या जगास झाली हायब्रीड ती पसंती
कसलाच भाव नाही असली पिकास आता

स्मरते अजून मजला खिडकीतली नजर ती
त्या चोरट्या क्षणाचा करतो तपास आता

पदरात लाजलेला तो चंद्रमा पहावा
ना जिन्स टॉप मध्ये तसली मिजास आता

ते पाहुणे बुडाले अन् पाहुणचार पळाला
हातात कागदी कप कुजका गिलास आता

सांगू नकोस बाबा ती रुपयातली कहाणी
लाखात कर्ज झाले असला विकास आता

बलराज संघई, 9420015108

## सेतु

आली दिवाळी आपल्या सर्वांच्या दारी
फेकली दप्तरे पोरांनी बघून ती अलमारी
चिवडा चकली बरफी फराळाची न्याहरी
असच काही वातावरण असेल का हो
प्रत्येकाच्या घरी?
थोड वेगळं आहे दिवाळीचं वातावरण
आणि महत्त्व त्या शाळाबाह्य मुलांसाठी जे
पोटासाठी मरतातत्या बालमजुरांसाठी जे
शिक्षणाच्या खर्चासाठी झटतातत्या उपेक्षित
लेकरांच्या मायबापांसाठी जे राब-राब
राबतात
पण असो, तुम्हाला मला पडलं तरी काय !
ही अशीच दुनियादारी मग अडलं तरी काय !
तो त्याच्या कर्माने आणि मी माझ्या धर्माने !
कर्मात-धर्मात माणुसकी होरपळते, त्यात एवढं
तरी काय!
बाल कामगार अधिनियम 1986 मध्येच
आला
दुरुस्ती करून शिक्षेपात्र गुन्हा मानण्यास,
ह्या असल्या समाजाला हात दाखवण्यास
कायद्यालाही तीस वर्षे
दशरथचा राम मात्र चौदा वर्षातच वनवासातून
मोकळा !
मुख्य-प्रवाह ह्या बाल मजुरांचा मुळीच नव्हे!
मॅडम च्या घरातील धूनी-भांडी कोणी
करावी?
सरांच्या दारात अर्ध्या पैश्यात सकाळी पेपर
कोणी फेकावे?
साहेबांनी हॉटेल मध्ये "छोटया" म्हणून
कोणाला दट्टी मारावी?
यांना शाळेत घालू तर मग आमच्या पोरांच्या
आरामाचं काय!
दिवाळीला फटाके फुटले नाही तर प्रदूषित
दिवाळीचं काय! सिग्नल वर भीक मागितली
नाही तर हैवानांच्या पोटाच काय! यांना टाकून
बोललो नाही तर आमच्या आत्मिक शांतीच
काय! व्यक्ती म्हणून आम्ही शिक्षित आहोत,
पण
समाज म्हणून सुशिक्षित व्हायचं अजून बाकी
आहे खड्ड्यांमध्ये फक्त खडी डांबर टाकून
रोड सुधरत नाही एवढं साधं सुध्दा आम्हाला
कंबर तुटल्याशिवाय कळत नाही
टपरीवर टांगलेले हक्क बघून वाद-विवाद
घालणाऱ्या बुद्धिजीवांनो
बाल मजुरांच्या हातातील साधनांच्या बेड्या
तोडून, त्यांच्या हाती पेन-पुस्तकांचे बंधन
घालावे लागेल, टपरी ते शाळा हा सेतु
"अ-आ-इ" च्या दगडांनीच रचावा लागेल
अमोल मोकासे.
9730781775

## बाबा



बाबा नावाचं हृदयातील,
एक हळुवार पान ,
त्या पानावर असतो ,
फक्त बाबा नावालाच मान!! १!!
बाबासाठी तीची नजर,
दारावरती खिळलेली,
बाबा दिसतात तिची कळी,
खुदकन उमललेली!! २!!
बाबा असतो तिच्यासाठी,
सुपरमॅन, शक्तीमान,
बाबा विना तीचे,
हालत नाही कसलेच पान!! ३!!
बाबासाठी असते ती ,
त्याच्या अस्तित्वाच्या खुणा,
मग बाबाची लाडाची लेक,
असे सर्वांनी खुशाल म्हणा!! ४!!
वर्षानुवर्ष कष्ट करून,
बाबा सर्व काही मिळवतो,
सासरी जाताना लेकीला,
भरभरून देत असतो!! ५!!
हृदयाचा तुकडा देताना ,
बाबा वेदना होतात तुला,
पण काळीज किती मोठ तुझं ,
याची जाणीव होईल का कुणा!!
६!!
मी आहे, काळजी घे !
हे बाबांचे शब्द काळीज,
पिळवटून टाकतात ,
सासरी जाताना डोळयांच्या कडा,
हळूच ओल्या करतात, !! ७!!
सासरी जाताना डोळयांच्या कडा,
हळूच ओल्या करतात ! ! धृ!!

सौ. मिलिंदा रवींद्रकुमार पवार
मु. पोः- वडूज, ताः- खटाव,
जिल्हाः- सातारा




# संत कान्होपात्रा


आधुनिक केसरी

सामान्य कुटुंबात जन्मालाआलेल्या आणि विठ्ठलभक्तिपर अभंगरचना करणाऱ्या कान्होपात्रा या इ.स.च्या १५ व्या शतकातील वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संतकवयित्री होत्या. पंढरपूर जवळच्या मंगळवेढा येथे त्यांचे वास्तव्य होते. बिदरच्या बादशहाने मागणी घातली म्हणून संत कान्होपात्रा यांनी पंढरपूरला विठ्ठलचरणी डोके ठेवून प्राण सोडले.

विठ्ठलभक्तीचा लखलखीत आविष्कार घडवणाऱ्या संत कान्होपात्रा विषयी फार कमी माहिती उपलब्ध आहे. त्यांनी बरीच अभंगरचना केली असावी, पण ते लिहून ठेवणारं कुणी नव्हतं. त्यामुळे त्यांचं खूप थोडं काव्य उपलब्ध आहे. पण त्यांचं जे भक्तीरसपूर्ण अभंग उपलब्ध आहेत त्यातल्या विठ्ठलभक्तीच्या आविष्काराने आपण दिपून जातो.

इतर विठ्ठलभक्त स्त्रियांहून संत कान्होपात्रा चं जीवन पूर्णतः भिन्न होतं. शामा नावाच्या अतिशय धनवान, रूपसंपन्न गणिकेच्या पोटी तिचा जन्म झाला. ऐषोआरामी आणि सुखोपभोगी वातावरणात ती वाढली. त्या घरात विठ्ठलभक्तीची परंपरा असणं शक्यच नव्हतं. वेश्याकुळातल्या स्त्रीला गुरू तरी कुठला लाभणार? पण गणिकेच्या रूढ अशा भोगविलासी मार्गाकडे न जाता ती परमार्थ मार्गाकडे वळली आणि उत्कट भक्तीने परमेश्वरस्वरूप पावली. पंढरपूरपासून सात कोसांवर मंगळवेढे गावात राहणाऱ्या धनाढ्य शामा नायकिणीची कान्होपात्रा ही मुलगी. वडील अर्थात कोण ते माहीत नव्हतं. पण शामाचा असा अंदाज होता की गावचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजर तिचा पिता असावा. लहाणपणीच तिच्या पायात बांधलेले गेलेले चाळ कोडकौतुकाचे नव्हते तर वेश्यावृत्तीला अपरिहार्य असं नृत्य शिकण्यासाठी होते. रूप आणि तारुण्याच्या जोरावर लोकांकडून पैसे वसूल करावेत असं वातावरण अवतीभोवती होतं. आईचा आग्रह तसाच होता. पण भक्तीचा अंकूर तिच्या हृदयात फुटला होता. कान्होपात्रा रूपवती होती. तितकीच बुद्धीमानही होती. ती मेनका-अप्सरेचा अवतार असल्याचं लोककथांमधून मांडलं गेलंय. गायन आणि नृत्यात तिने अगदी लहान वयात प्रावीण्य मिळवलं होतं. हळूहळू तिचं कलानैपुण्य आणि सौंदर्याची कीतीर् दूरवर पसरली. तिची आई अत्यंत धनवान गणिका होती. महालासारखा त्यांचा भव्य प्रासाद होता. अनेक दासी तिच्या सेवेला तत्पर होत्या. शामाने कान्होपात्रेच्या शिक्षणाची चोख व्यवस्था केली होती. कान्होपात्रेने आपला गणिका व्यवसाय पुढे चालू ठेवावा. राजदरबारी रूजू व्हावं असं शामाला वाटत होतं. तर कान्होपात्रेला त्याची किळस वाटत होती. मुलीच्या रूपगुणांना योग्य असा पुरूष कान्होपात्रेला मिळावा असं शामाला वाटत होतं. पण कान्होपात्रेने आईला स्पष्ट सांगितलं की माझ्यापेक्षा रूपवान पुरूष असेल तर मी त्याच्याजवळ राहेन, विवाह करेन. ही अट अर्थात कठीण होती. मंगळवेढ्याचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजर याची नजर कान्होपात्रेवर पडली. त्याने कान्होपात्रेचं नाचगाणं बघण्याची इच्छा व्यक्त केली. शामाने काहीतरी सांगून कान्होपात्रेला कसंबसं सदाशिवसमोर आणलं. त्याची विषारी नजर तिच्यावर पडली. याच्यासारख्या नीच माणसाच्या इच्छेखातर आपण गायन-नृत्य करणार नाही असं तिने त्याच्या तोंडावर सांगितलं. भडकलेल्या नगराध्यक्षाने सूडसत्र सुरू केलं. ती त्याची मुलगी असल्याचं शामाने सांगून पाहिलं. पण तो इतका वासनांध झाला होता की हे खोटं असल्याचं त्याने म्हटलं. शामा आणि कान्होपात्रेचा छळ सुरू झाला. वैभव ओसरलं. त्याच्याविरूद्ध न्याय कोण देणार? अखेर शामाने त्याची माफी मागितली. त्याने तीन दिवसांत कान्होपात्रेला आपल्यासमोर आणून उभं करण्याचा हुकुम दिला. या संकटाने कान्होपात्रा डगमगली नाही. ती देवासमोर हात जोडून जप करू लागली. रात्रभर ती जप करतच होती. पहाटे डोळा लागला आणि भजन-टाळांचा गजर ऐकून कान्होपात्रेला जाग आली. वारकऱ्यांचा एक जत्था आषाढीनिमित्त भजन गात पंढरपूरास चालला होता. त्याक्षणी मनातला अस्पष्ट विचार तिने पक्का केला. तिची म्हातारी दासी हौसा वारकरी होती. बळजबरी अत्याचारातून सुटण्याची संधी जणू देवाने तिला दिली होती.

क्रमशः







श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

आधुनिक केसरी

अ) गणिताची मुलभूत संकल्पनाः मोठ्यातमोठी व लहानातलहान संख्या लक्षात ठेवा :




ब) गणिताची मुलभूत संकल्पनाः प्रश्न संच

**प्रश्न :** रिकाम्या जागा भरा.

1) विशिष्ट अंकी मोठ्यातमोठी संख्या बनवताना------हा अंक मांडून संख्या लिहीतात?

2) विशिष्ट अंकी लहानातलहान संख्या बनवतांना------हा अंक मांडून संख्या लिहीतात?



गणिताच्या मुलभूत संकल्पना / 27

मोठ्यात मोठी व लहानात लहान संख्या

| अंकी संख्या | | मोठ्यात मोठी संख्या | लहानात लहान संख्या | त्यांच्यातील फरक |
|---|---|---|---|---|
| एक अंकी | 01 | 9 | 1 | 8 |
| दोन अंकी | 02 | 99 | 10 | 89 |
| तीन अंकी | 03 | 999 | 100 | 899 |
| चार अंकी | 04 | 9999 | 1000 | 8999 |
| पाच अंकी | 05 | 99999 | 10000 | 89999 |
| सहा अंकी | 06 | 999999 | 100000 | 899999 |
| सात अंकी | 07 | 9999999 | 1000000 | 8999999 |
| आठ अंकी | 08 | 99999999 | 10000000 | 8999999 |
| नऊ अंकी | 09 | 999999999 | 100000000 | 8999999 |

3) पाच अंकी मोठ्यातमोठी संख्या----ही आहे? 4) सहा अंकी लहानातलहान संख्या----ही आहे? क) उखाणाः 1) धन शब्दाचा समानार्थी शब्द आहे दौलत, विशिष्ट अंकी मोठ्यातमोठी संख्या बनवताना, जितकी अंकी संख्या विचारली असेल तेवढे 9 हा अंक मांडून संख्या लिहीतात. 2) मित्र शब्दाचा समानार्थी शब्द आहे दोस्त, विशिष्ट अंकी लहानातलहान संख्या बनवताना 1 हा अंक मांडून त्यापुढे उरलेले सर्व शुन्य लिहीतात. ड) कविता : क्रमांक 18

तुकारामनीती
भाग 31

# दीप घेउनियां धुंडिती अंधार ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**अज्ञानरूपी अंध:कारमय मार्गाने अंतर कापणाऱ्या लोकांना आपले दैनंदिन जीवन प्रकाशमय, सर्वांग-सर्वार्थ कल्याणाच्या मार्गाने प्रशस्थ करण्यासाठी स्वानुभवाने संपन्न झालेल्या महानुभाव व्यक्ती सातत्याने पथदर्शी, मार्गदर्शक होत आल्या आहेत. सर्वच प्राणीमात्रांमध्ये ईश्वराधिष्ठान असल्याची निष्ठा बाळगणाऱ्या तत्ववेत्यांची मांदियाळी अनवरत पृथ्वीतलावर आपले विश्वकल्याणाचे नित्य बीजारोपण करताना 'जगा लावावे सत्पथी।' या नाथोक्तीप्रमाणे कार्यरत आहेत. ही सर्वच महान चिंतक मंडळी आपल्या लोकोत्तर जीवनधारणेने समाजात सार्वकालिक शाश्वत जीवनमूल्यांचे चिरंतन सिद्धांत मांडून जीवनातील क्षणिक बाबींनी निर्माण झालेला रज-तमोगुणी अंधकार दूर करण्याचे कार्य अविरतपणे करत आले आहेत. या चिंतकांची यादी फार मोठी आहे, एवढी मोठी की, आजचा संपूर्ण लेख त्यांच्या नावानेच पूर्ण होईल! या यादीतील अगदी अलीकडच्या काळातील म्हणजेच सतराव्या शतकातील महान समाजोद्धारक व्यक्तिमत्व म्हणजे संत तुकोबाराय! मित्रहो, हा केवळ योगायोग आहे. कालपासून दीपावलीचे 'दीपोत्सव' पर्व सुरु असून मी आजच्या 'तुकाराम नीती' चिंतनासाठी अभंग शोधत होतो, आणि हा अभंग समोर आला!**

अगदी सुंदर योग जुळून आला! या दीपावलीच्या पर्वात अंधःकार मिटवणारा हा अभंग सहजतेने समोर यावा आणि त्यातून आणखी तुकोबांचे अनुभवसमृद्ध वाङ्मय वाचनात, चिंतनात यावे!

दीप घेउनियां धुंडिती अंधार । भेटे हा विचार अघटित ॥१॥
विष्णुदास आम्ही न भिओ कळिकाळा । भुलों मृगजळा न घडे तें ॥ध्रु.॥
उधळितां माती रविकळा मळे । हें कैसें न कळे भाग्यहीना ॥२॥
तुका म्हणे तृणें झांके हुताशन । हें तंव वचन वाउगेचि ॥३॥
(शा.अ.गाथा अ.क्र.५६३)

प्रस्तुत अभंगात जगद्गुरू तुकोबाराय सहज मानवी प्रवृत्तीचे विश्लेषण करतांना जीवनातील विरोधाभासी विचारांचे प्रतिपादन करतात. वारकरी संत आपला विचार मोठ्या आत्मविश्वासाने समाजासमोर मांडतांना लोकांना जगण्याविषयी सहजतेने सजग करून जातात. या सर्वांपैकी एक म्हणजे कलशस्थानी असणारे तुकोबाराय वारकऱ्यांचा सर्वसामान्य गुणधर्म विषद करतात. तुकोबांचे लोकप्रसिद्ध अभंग सामान्य, बध्दापासून ते मुक्तांपर्यंत सर्वांचे यथार्थ जीवनाचे मार्गदर्शन करणारे आहेत. त्या अभंगातील विचार माणसाला पटकन विचारप्रवण करतात. तुकोबांचे अभंग दैनंदिन जीवन जगण्याच्या सिद्धांत आणि सिद्धतेसाठी अत्यंत सहज-सोप्या पद्धतीने आपल्या भूमिकेची पेरणी करतात.

त्यातीलच हा अभंग म्हणजे आपण संसारिक माणसांनी कसे वर्तन केले पाहिजे (?) याचे प्रतिपादन करतो. वारकरी किंवा एखादा सच्चा भक्त म्हणजेच विष्णुदास कसा असला पाहिजे? याचे उत्तर म्हणजे तो जीवनात येणाऱ्या कोणत्याही संकटांना भिक न घालणारा, न घाबरणारा असला पाहिजे! एवढेच काय, कळीकाळ म्हणजे समोर प्रत्यक्ष मृत्यू जरी उभा राहिला, तरी तो आनंदाने त्यांस सामोरे जाणारा असावा! तोच खरा वारकरी, खरा भक्त! त्यासाठी संत तुकारामबोवा पहिल्या चरणात 'दीप घेवूनीया धुंडिती अंधार' ही ओळ लिहून जे खरे भक्त आहेत त्यांना भीती कशाची? अगदी तुकोबांच्या अभंगाद्वारे सांगायचे झाल्यास,

आस भय चिंता लज्जा काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा॥

असे मागणे ईश्वराकडे करताना दिसतात. ज्यांच्या जीवनात सद्विचार, सत्संगती, लोकल्याण, शुद्ध-सात्विक-प्रांजळ भाव, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आदि सद्गुणरुपी दीप असतो त्यांच्या जीवनात अंधार कसा आणि कुठून येणार? हा मुलभूत प्रश्न तुकोबाराय करतात.

परवा झालेल्या परतीच्या पावसाने महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची अक्षरशः धूळधाण झाली आहे. बळीराजाच्या हाता-तोंडाशी आलेला घास मातीत मिसळला आहे. यालाच म्हणायचं प्रारब्ध! नशीब! जो तो झालेल्या नुकसानीची चर्चा करतोय. जे झालं ते नक्कीच अत्यंत वाईट आणि मन विषन्न करणारं आहे! लाखो हेक्टर शेतीतील हाताशी आलेलं सोयाबीन, कापूस अक्षरशः जमिनीसकट वाहून गेलं आहे! बळीराजाची संपन्न होणारी दिवाळी अक्षरशः पाण्यात गेली! कशाच्या आधारे तो दीपावली साजरी करणार? शेतात झालेला खर्च सुद्धा वसूल व्हायची मारामार आहे! हे सगळं चित्र पाहावंसं वाटत नाही. ज्याप्रमाणे एखाद्या अपघातात आपल्या डोळ्यांसमोर आपली प्रिय व्यक्ती कालवश व्हावी, अगदी तशी परिस्थिती झाली आहे! परंतु त्याला करणार काय? याला उपाय काय? झालेल्या नुकसानीस आपण कुणाला जबाबदार धरावे? कुणाकडे तक्रार करावी? आता बरेच जन विविध युक्त्या लढवून सरकारकडे सानुगृह अनुदानासाठी प्रयत्न करतील. सरकार अनुदान देईलही, मात्र शेतात भरभरून होणाऱ्या उत्पन्नाएवढे ते नक्कीच नसेल! मग जावे कुणाकडे? कुणाला सांगावे? याचे सुंदर उत्तर म्हणजे हा अभंग आहे! अशा खडतर परिस्थितीत संत तुकोबांचे जीवन आपल्याला मार्गदर्शक ठरते. त्यांचा संघर्ष पथगामी ठरतो.

भक्तांकडे भक्तीची अलौकिक शक्ती असतांना त्याला संसारिक दुःखे आपल्या नित्य-नैमित्तिक कार्यापासून विचलित करू शकत नाहीत. संसारिक दुःखे ही क्षणभंगुर असून त्यामुळे माणसाने विचलित होता कामा नये. ज्याप्रमाणे एखाद्या माणसाने सूर्यावर माती फेकून त्याला झाकण्याचा प्रयत्न केल्यास, सूर्य झाकण्या ऐवजी माती फेकणाऱ्याच्याच डोळ्यांत माती जाते. त्याच बरोबर गवताच्या पेंढीने अग्नी झाकून ठेवता येईल का? उलट आगीत तेल ओतल्यासारखे होईल! तेंव्हा, जे खरे भक्त आहेत ज्यांनी इथल्या संसाराचे क्षण भंगुरत्व जाणले आहे, ती माणसे कोणत्याही संकटांना घाबरून अथवा हतबल होऊन त्यांना भिक घालत नाहीत. संसार हा मृगजळ असून आत्तापर्यंत त्याला कुणीच जिंकू शकला नाही. तेंव्हा ज्याच्याकडे भक्तीची आत्मशक्ती आहे, म्हणजेच ज्याने षड्विकारांवर विजय मिळवलेला असून ज्यांना जीवनाच्या अनिश्चिततेची पुरती कल्पना आली आहे असे लोक म्हणजे श्रीमद् भगवतगीतेतील

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ। ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि॥

या श्लोकाप्रमाणे त्याची अवस्था स्थितप्रज्ञ होते. त्यांचे लाभ-हानी



अथवा विजय-पराजय या दोन्ही अवस्थेतील अंतर पूर्णतः संपुष्टात येते. तो केवळ आणि केवळ आत्मानंदात रममाण असतो. त्यासाठी संत तुकोबांचा हा अभंग आपल्याला वर्तमान परिपेक्षात पथदर्शी असून आपण त्यापासून थोडाफार तरी बोध घेऊन होणाऱ्या क्षणिक नुकसानीचे चिंतन करणे सोडून द्यावे.

त्याचबरोबर आज दिपावली म्हणजेच प्रकाशपर्वाच्या अनुषंगाने आपल्या सर्वांनाच हा अभंग जागे करणारा आहे. दिवा म्हणजेच प्रकाश! या प्रकाश पर्वावर आपण सर्वांनीच आपल्या जीवनातील तमोगुनांना बाहेर घालवून तिथे केवळ आणि केवळ प्रकाशाची पेरणी करायला हवी! आज भोवताल आपल्याला हजारो साधनं अंधाराच्या म्हणजेच वाईट गोष्टींच्या दिशेने न्यायला टपून बसली आहेत. अंधाराच्या दिशेने आपले स्वागत होणार आहे! आपल्याला काम, क्रोध, इर्षा, लोभ, अहंकार, असूया आदि मित्र सातत्याने आपलंसं करण्यासाठी वात पाहत बसले आहेत. त्यासाठी आपण नित्य नित्य सावध राहून आपला ज्ञान, संयम, शांतता, शुद्ध-सात्विक भाव, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा इत्यादी सद्गुणांचा दिवा सातत्याने तेवता ठेवावा लागणार आहे! हा दीप सतत प्रज्वलित होत राहिला की; सहजतेने अज्ञानरूपी अंधःकार गायब होऊन जाईल. आज दीपावलीच्या या प्रकाशपर्वावर तुकोबांचा हा अभंग आपल्याला नित्य नित्य ज्ञान-भक्ती-वैराग्याचा दिवा आपल्या हातात तेवता ठेवण्याचे आवाहन करतांना दिसताहेत! त्यासाठी आपण आपल्यासह आपला परिवार आणि परिसर अधःकारमुक्त करून प्रत्येक व्यक्ती आपल्या चैतन्य-चातुर्य आणि चांगुलपणाने न्हाऊन निघाला पाहिजे! त्याने ज्ञान-कर्म-भक्तीचे उटणे लावून अज्ञान-क्रोध-लोभ नावाचा मळ सद्विचार चिंतनाच्या पाण्याने स्नान करून धुवून टाकला पाहिजे! हेच खऱ्या अर्थाने दीपावलीचे अभ्यंगस्नान ठरणार आहे! प्रत्येकाने असे अभ्यंगस्नान केल्यास त्याच्या परिवारातील क्षणिक दुःख-दैन्य-दारिद्र्य नष्ट होऊन सगळेजण आनंदाने हा प्रकाशोत्सव साजरा करतील!

तेंव्हा, चला मित्रांनो, या प्रकाशपर्वावर आपण सर्वजन संकल्प, प्रार्थना करूयात की, बळीराजावरील हे संकट लवकरात लवकर निवळावे. सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ पंचनामे करून दीपावलीनिमित्त काहीतरी मदत करावी जेणेकरून त्यांची दिवाळी आनंदात साजरी होईल! तसेच ज्याला जसे शक्य होईल तशी आपल्या परिवार अथवा नातेवाईकांना या प्रसंगात धीर देऊन, प्रसंगी आर्थिक मदत देऊन काही काळासाठी आधार देण्याचे कार्य करावे! आपल्याबरोबर त्यांनासुद्धा सोबत घेऊन दिवाळी साजरी करावी! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने संत तुकोबाराय समजून घेणे होय! असे झाल्यास खऱ्या अर्थाने सर्वांचीच दिवाळी थाटात साजरी होणार आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा माल जसे कि; झेंडूची फुले, भाजी-पाला इत्यादी वस्तू खरेदी करतांना त्याचा भाव न ठरवता शेतकरी विकेल त्या किमतीत खरेदी करून त्याला उभारी देण्याचे काम करावे. आपण बाजारात सर्वच वस्तू छापलेल्या किमतीत खरेदी केतो. तिथे कोणत्याही प्रकारची घासाघीस करत नाहीत, मात्र शेतकऱ्याच्या मालाची खरेदी करतांना घासाघीस करतो. हे कुठेतरी थांबवून बळीराजाच्या मालाचे मोल करून त्याचा सन्मान करावा! शेतकरी जगला तरच देश जगेल! हे सूत्र समोर ठेवून आपण सगळेजण आनंदाने दिवाळी साजरी करूयात! भूक, दुःख, दैन्य, दारिद्र्य इत्यादी अंधःकार समूळ नष्ट करून आनंदाचे दीप घरोघरी लावण्यासाठी प्रयत्नशील राहुयात! दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! जय तुकोबाराय!






# भांडवलदारांनो, दिवाळीला गरिबाचा विचार करणार का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**भारतीय हिंदु संस्कृतीमध्ये सण,उत्सवाला रूढी परंपरेनुसार महत्व प्राप्त झालेले असलं तरी अनादिकाळापासून सुरू असलेल्या उत्सवाचं स्वरूप बदलताना दिसतं. एक काळ असा होता सण उत्सवालाच करंज्या, लाडू मिळायच्या. पण ती परिस्थिती बदलली असुन बारामाही दिवाळी प्रत्येकाच्याच घरात साजरी होताना दिसते. आपआपल्या परीने उत्सव साजरे प्रत्येकजण करतात. दिपावली आनंद उत्सवाचा तथा स्वजीवन प्रकाशमय परिवर्तित करणारा उत्सव आपण समजु. भांडवलदार अधिक चांगल्या जोमाने साजरा करतो. पण त्यापेक्षा शेवटचा माणुस त्याच्या पद्धतीने साजरा करतो. गरीबी- श्रीमंतीची दरी अजुनही संपलेली नाही. त्यामुळे जे भांडवलदार किंवा श्रीमंत असतात त्यांनी उत्सवाच्या पार्श्वभुमीवर गरिबांच्या दिवाळीचा विचार करून आपल्या परीने त्यांना काही मदत करता येईल का?**

हा परोपकार विचार करणे महत्वाचे वाटते. शेवटी गोरगरीबाला मदत करून जगण्यात जो आनंद मिळतो त्यापेक्षा दुसरी दिवाळी कुठे साजरी होत नाही. नव्या पिढीच्या तरूणांनी हा विचार करताना प्रत्येकी एकाने यंदाची दिवाळी पाच गरिबांच्या सोबत साजरी केली तर मग परमेश्वरही भांडवलदाराचं भांडवल निश्चित कमी होवु देणार नाही हे तितकंच खरं.

आज धनत्रयोदशी अर्थात वसुबारस परवा झाली म्हणजेच दिपावली उत्सवाला प्रारंभ झाला. अभ्यंगस्नान, लक्ष्मीपुजन, भाऊबीज अशा विविधांगी चार-पाच दिवसाचं स्वरूप म्हणजे दिपावली. भारतीय संस्कृती प्रत्येकाचं जीवन तेजोमय करणारी निश्चित त्यातही हिंदु संस्कृतीमध्ये रूढी परंपरा वर्तमान व्यवस्थेला निश्चित मार्गदर्शक करणाऱ्या असतात. प्रत्येक उत्सवाचं स्वरूप वेगवेगळं आहे. दिपावली हा उत्सव एकत्रीत कुटुंब पद्धतीत प्रामुख्याने जास्त आनंद देणारा पुर्वीपासून परंपरा रूढ आहे.

अनेकांच्या कुटुंबात आजही भावंडं एकत्रित येतात तर दुसरीकडे अशा उत्सवातही एकमेकांचं तोंड न पहाणारी कुटुंब तथा भावंडं आजही आहेत ते दुर्भाग्य म्हणावे. या निमित्ताने एकत्रित येणं मग बहिणी, जावाई, नातवंडं या साऱ्या गोष्टीचा आनंद आई-वडिलांनाही असतो. दिपावली अर्थात दिवाळं काढणारां सण असंही म्हणायला हरकत नाही. लोक नवे कपडे घेतात. दागदागिने घेतात. अगदी मालमत्ता असो किंवा वाहन खरेदी असो. ज्यांच्याकडे पैसा गरजेनुसार साधन सुविधा घेतात. पण असाही वर्ग समाजात आहे ज्याला केवळ एकवेळ पोटाची काळजी त्याचं काय? असा प्रश्न सामाजिक जाणिव ठेवुन नेहमीच पडतो. खरं म्हणजे जीवनात संवेदना असतील त्यांनाच सामाजिक जाणिव प्रचिती होते. लाखो रूपये जवळ आहेत पण संवेदना नाही, परोपकार भावना नाही किंवा दुसऱ्याला मदत करण्याची किंचितही जाणिव नाही. त्यांच्या आडमाप पैशाला कुणी विचारत नाही तो भाग वेगळा. गरिब हा त्याच्या परीने जीवन जगतो. तो कुणाच्या दारात जात नाही. श्रमावर आधारित त्याची दिवाळी असते. आता बघा, पाच दिवस दिवाळी साजरी करणारे मौजमजा करतील. पण असाही वर्ग पाचही दिवस त्याच्या डोळ्याला दिवाळी दिसत नाही. कारण त्याचं जीवन अंधःकारमय असतं. मग तो भर दिवाळीत ऊसाच्या फडात मजुरी करताना दिसेल तर कुणी आपआपल्या पद्धतीने कामावर दिसतील. कधीकधी गरिबीच्या वेदना एवढ्या भयानक असतात याचा विचार करवत नाही. आपण जेव्हा उत्सव साजरा आनंदात करत असतो किंवा वेगवेगळे पदार्थ बनवुन स्वादिष्ट जेवण करतो त्याचवेळी गरजु आपल्या घरी कुणी भांडी घासायला येतो तर कुणी झाडझुड करायला येतो शेतातले सालगडी बैलकोठा साफ करतात तर आपल्या वाहनावरचा ड्रायव्हर गाडी साफ करायला येतो. अगदी सफाई कामगारापासून हा सारा विषय चिंतेचा कारण मानवाची निर्मिती गरिबी-श्रीमंती अशा स्वरूपाची पहायला मिळते. एका गोष्टीचा विचार भांडवलदारा वर्गांनी नेहमीच केला पाहिजे. पैशाच्या जीवावर चंगळवादात जगताना हा वर्ग भोगवादाच्या आहारी निश्चित गेलेला असतो. त्यावेळी गरिबांचा विचार न शिवे मनासी. आजही ज्यांच्या घरात पैशाचा धुर निघतो अशा भांडवलदारांना चंगळवादापुढे कुणीच दिसत नाही तो भाग वेगळा. पण ही मंडळी



दिवाळी उत्सवात तरी सुखी समाधानी खरंच असतात का? हाही संशोधनाचा विषय. सहज डोळ्यासमोर एक गोष्ट आणुन बघा दिवाळीत शांत झोप कुणाला येवु शकते? उत्तर एकच जो भांडवलदार आहे, ज्याच्याकडे आडमाप पैसा आहे, हा वर्ग शांत झोपु शकत नाही. पण दुसऱ्या बाजुने ज्याला दिवाळी साजरी करण्यासाठी एक रूपाया नाही असा आमचा गरिब शांत प्रकाशमय उजेडातसुद्धा डोळे बंद करून झोपू शकतो. सामाजिक व्यवस्थेमधील हे चित्र कधी कधी विचार निश्चित केला पाहिजे. पण एक गोष्ट आत्मस्वरूपाला विचार करायला लावणारी आहे आणि त्या दृष्टीने बघितलचं पाहिजे. ज्यांच्याकडे चार पैसे साधन सुविधा आहेत किंवा परमेश्वराने ज्यांना भांडवलदाराच्या पंक्तीत बसवलं अशांना पैसा केवळ त्यांच्या जगण्यासाठीच देवानं दिला असं नव्हे. याउलट माझ्याकडे चार पैसे आहेत ते परोपकारासाठी किंवा गोरगरिबांसाठी त्यातला काही सहभाग आपण योगदानाच्या माध्यमातुन दिला पाहिजे ही सामाजिक संवेदना ज्यांच्याकडे आहे असे भांडवलदार गोरगरीबांच्या लोकांना सोबत घेवून दिवाळी साजरी निश्चित करत असतील तर मग परमेश्वर त्यांच्या जीवनात कधीही कमी पडू देत नाही.बाहेरचं जावू द्या दिपावली साजरी करताना आपल्या संसारासोबत किमान आपले बंधू, बहिणी, जावाई, नातु, पणतु एवढेच नाही तर सगेसोयरे, भावकी, आप्तस्वकीय यांचा जरी विचार केला तरी दिवाळीचा आनंद आपण घेवु शकतो पण वर्तमान व्यवस्थेत रक्ताची नाते जर मनानं एकत्रित येत नसतील किंवा आपल्या बहिणीला एक साडी आणायला नको वाटत असेल तर असे आपलपोटे जमिनीवर ओझं म्हणून जीवन जगतात हे मात्र नक्की. आपल्या परीने आपण गरिबांना जर मदत केली तर खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद घेवू शकतो. मग चार कुटुंब त्यांना कपड्याच्या स्वरूपात मदत असेल, कुठे फराळाच्या स्वरूपात मदत असेल असं कुणी करत नाही असं नव्हे. कारण अनेकजण दिपावली गोरगरिबांच्या सोबत साजरी निश्चित करतात. अगदी जुन्या पिढीतली माणसं आजही स्वतःचा घास एकटे कधीच खात नाहीत. दुसऱ्याचा विचार करूनच जीवन जगतात. पण अलीकडे नव्या पिढीतली तरूणाई चंगळवादाच्या भोगवादाने जास्त जावू लागली. त्यामुळे विशेषतः तरूण मुलांनी दिपावलीसारखा उत्सव गरिबांच्या सोबत साजरा जर केला तर तुमचं भविष्य प्रकाशमय निश्चित होईल. तुमच्या जीवनातला अंधार दुर झाल्याशिवाय रहाणार नाही. चला तर मग आपण एकट्याने दिवाळी साजरी न करण्यापेक्षा गरिबाचा विचार करून साजरी करू शक्य त्या प्रमाणात लोकांना मदत करू या निमित्ताने संकल्प करताना प्रदुषणमुक्त दिवाळी साजरा करणे हा मनाशी ठराव करावा हे नक्कीच.

लोका सांगे ज्ञान, आपण कोरडे पाषाण हा लिहिण्याचा उठाठेव केल्यानंतर अनेक माझ्यावरही आक्षेप घेवु शकतात पण योगदान दिल्याचा गवगवा करणाऱ्यापैकी मी नाही. पण एक निश्चित आदर्श घेण्यासाठी सांगण्याची हिंमत करतो. यंदाची दिवाळी माझ्या परीने साजरी करताना सहा कुटुंबियांना अर्थात गरिबांना सोबत घेवुन साजरी करण्याचा मी प्रयत्न केला आहे. स्वतःला नवं वस्त्र घेण्याअगोदर मी त्या लोकांना आनंद देण्याचा प्रयत्न केला. हाच आदर्श आपआपल्या पातळीवर प्रत्येकाने घेतला तर या उत्सवाचं सादरीकरण मानवतेच्या प्रगतीने झाल्यासारखं निश्चित होईल.

# कांद्याने असंही रडवलं

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात अतिवृष्टीमुळे औरंगाबाद शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले कांदा सडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कांद्याचे पैसे कसे द्यायचे, अशी असून मोठ्या कष्ट्याने वाढवलेली पिके डोळ्यांदेखत पाण्याखाली गेली चिंता आता या व्यापाऱ्यांना सतावत आहे. काहींनी स्वतःचे पैसे आहेत. मात्र या पावसाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसला, असे उपलब्ध करून शेतकऱ्यांना बिले दिली मात्र त्यांचा कांदा वाहून गेल्याने नाही. सोयगाव तालुक्यात याचा फटका व्यापाऱ्यांनाही बसला आहे. तोटा झाला आहे. ऐन दिवाळीत आलेल्या या संकटामुळे व्यापाऱ्यांची टाकळी रस्त्यालगत काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कांदा कोंडी झाली आहे. कादरिया ट्रेडर्श मो. रफिक मो. शब्बीर यांनी काही कांदा घरचा तर विकत घेऊन साठवून ठेवला होता. बुधवारी मध्यरात्री कोपरगाव तालुक्यात अतिवृष्टी यांनी गुरुवारी सकाळी या नुकसानीची पाहणी केली आणि सर्व कांदा झाली. त्यामुळे अचानक आलेल्या पाण्यामुळे या शेडमधील व्यापाऱ्यांना धीर दिला. झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी व्यापान्यांचा कांदा पाण्यात वाहून गेला. परिणामी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले.पाण्याचा प्रवाह थांबल्यावर उरलेला कांदा पाण्यावर बुधवारी पहाटे मध्यरात्री विजांच्या



कडकडाटासह पाऊस तरंगत होता. भिजलेला हा कांदा वाया गेल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे मध्यरात्री आलेल्या पाण्यामुळे काहीच कळले झाले. यामुळे गुरुवारी कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांद्याचे लिल नाही. नैसर्गिक संकट भयावह आहे. यापूर्वी एवढ्या मोठया प्रमाणात वही बंद ठेवण्यात आले होते. टाकळी रोडवरील व्यापाऱ्यांना दोन पाऊस कोसळला नाही. विजेचा कडकडाट प्रचंड होता. या व्यापाऱ्यांचे वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीचाही तडाखा बसला होता. सावळदबारा येथे अशा बऱ्याच शेतकऱ्यांचा कांदा सडला आहे तर काही शेतकऱ्यांनी फेकून दिला आहे त्यापैकी शेतकरी बालूआप्पा गोंडबे, शे.राऊफखाँ बशीरखाँ, दिनेश चोपडे, संदीप राजपूत, संतोष राजपूत, प्रमोद साखरे, नारायण घोडके शेतकरी सावळदबारा यांनी अशी माहिती दिली आहे.

# शिधापत्रिकाधारकांना दिवाळी किट तातडीने वाटप करा-प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात शिंदे- फडणवीस सरकारने दिवाळीपूर्वी गोरगरिब शिधापत्रिकाधारकांना दिवाळी कीट देण्याच्या घोषणेची औरंगाबाद जिल्ह्यात केली होती.दिवाळी तोंडावर आलेली असतांनाही अंमलबजावणी झाली नाही, शिधापत्रिकाधारकांना दिवाळी कीट तातडीने वाटप करून गोरगरिबांची दिवाळी गोड करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रा.जीवन कोलते यांनी केली आहे.यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात जीवन कोलते यांनी म्हटले आहे की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत प्राधान्य कुटुंब योजना, अंत्योदय अन्न योजना व एपीएल योजनाधील शिधापत्रिकाधारकांना दिवाळी सणानिमित्त दिवाळी कीट देण्याची घोषणा शिंदे - फडणवीस सरकारने केली आहे. कोणत्याही स्वस्त धान्य दुकानात दिवाळी कीट आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. दिवाळी कीट वाटप करून गोरगरिबांची दिवाळी गोड करण्याची सरकारची घोषणा फसवी निघाली असल्याची टीका प्रा. कोलते यांनी केली आहे. दिवाळीच्या सुट्टीत तहसील कार्यालयात केवळ नियंत्रण कक्ष स्थापन करून व शिधापत्रिकाधारकांना दिवाळी कीटापासून वंचित ठेवू नका अशी विनंती तहसीलदार रमेश जसवंत यांच्याकडे प्रा. कोलते यांनी केली आहे.






# सेवा आरोग्य फाउंडेशनतर्फे धन्वंतरी पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कर्वेनगर येथील हिंगणे होम कॉलनी मधील सेवा आरोग्य फाऊंडेशन च्या कार्यालयात धन्वंतरी जयंती व धनत्रयोदशी निमित्त धन्वंतरी पूजन कार्यक्रम घेण्यात आला.
सेवा आरोग्य फाऊंडेशनचे संचालक प्रदीप कुंटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच सेवा आरोग्य तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध सेवा वस्तीतील आरोग्य कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.सेवा आरोग्य तर्फे चालविण्यात येणारे मुलांसाठीचे संस्कार केंद्र,तरुणीसाठी घे- भरारी उपक्रम,सेवा वस्तीतील चालविण्यात येणारे आरोग्यकेंद्र याची विस्तृत माहिती दिली. आयुर्वेदाचे प्रवर्तक धन्वंतरी यांचा जन्म याच दिवशी झाल्याची कथा आहे. हा केवळ योगायोग नाही.प्रत्येकाने शरीर स्वास्थ्यासाठी उत्तम आहार,स्वच्छता,योग्य व्यायाम व योग्य विश्रांती याकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे प्रदीप कुंटे यांनी यावेळी सांगितले.दीपावली सणातला धनत्रयोदशी हा सण धन्वंतरी पूजनातून हेच सांगत असतो.पैसा सोन, या धनाची चोरी होऊ शकते पण उत्तम शरीरस्वास्थ्य, मन स्वास्थ्य, आणि बौद्धिक स्वास्थ्याची चोरी होऊ शकणार नाही हेच धन आपल्याला सुख, आनंद प्राप्त करून देणारे असते म्हणून आपण या धनप्राप्तीसाठी धन्वंतरी कडे प्रार्थना करू या असेही प्रदीप कुंटे यांनी यावेळी आवाहन केले.



धन्वंतरी पुजनाचे पौरोहित्य ( दिव्यांग ) गुरुजी अजित कुंटे यांनी केले.धन्वंतरीची पूजा डॉ प्रियांका मोहोळ-पुरोहित व अभिषेक पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आली.या प्रसंगी दिव्यांग गुरुजी अजित कुंटे याच्या जिद्दीबद्दल व जीवनातील संघर्षाबद्दल सेवा आरोग्य फाऊंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.
कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संभाजीभागाचे भाग संघचालक अनिल व्यास, कार्यवाह सुधीर जवळेकर, कर्वेनगर संघचालक उदयन पाठक, उल्हासराव जोशी, सेवा आरोग्य चे संचालक मनोज देशमुख, संजीव बेंद्रे, रवींद्र शिंगणापूरकर, मोरेश्वर कुंटे, माधवी कुंटे, नगरसेविका मिताली सावळेकर यांची मुख्य उपस्थिती होती. कार्यक्रमास सेवा आरोग्य फाऊंडे शनचे डॉक्टर्स, सेवावृती कर्मचारी, केशव-माधव विश्वस्त निधीचे प्रतिनिधी, सेवा वस्तीतील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जयदत्त क्षीरसागर यांची ठाकरे गटातून हकालपट्टी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** गेल्या काही दिवसांपासून बीडमधील शिवसेनेचे नेते जयदत्त क्षीरसागर हे भाजपामध्ये सामील होणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. खुद्द क्षीरसागर यांनी आपण ठाकरे गट सोडणार असल्याचे कोणतेही सूतोवाच केले नव्हते. मात्र, ते भाजपामध्ये जाण्यास इच्छुक असल्याचे सांगितले जात होते. या पार्श्वभूमीवर आज बीडमधील ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल जगताप यांनी माध्यमांशी बोलताना केलेल्या वक्तव्यांमुळे जयदत्त क्षीरसागर यांची शिवसेनेतून रीतसर हकालपट्टी झाल्याचे समोर येत आहे. तसेच, दोन दिवसांपूर्वी झालेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमातील उपस्थिती यासाठी कारणीभूत ठरल्याचे बोलले जात आहे. क्षीरसागर यांनी मधल्या काळात उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाविषयी अनेकदा उघडपणे नाराजी बोलून दाखवली आहे. शिंदे गटाच्या बंडखोरीनंतर क्षीरसागरही त्यांच्यासोबत जातील असा कयास बांधला जात होता. मात्र, तसं झालं नाही. पण गेल्या काही दिवसांपासून क्षीसागर भाजपामध्ये जाण्यास उत्सुक असल्याचे बोलले जात आहे. भाजपा आणि शिंदे गट यांची युती झाल्यामुळे बीडमधून नेमकं कोण आगामी निवडणूक लढवणार? या संभ्रमामुळेच क्षीरसागर यांनी अद्याप भाजपात जाण्याचा निर्णय घेतला नसल्याचे सांगितले जात आहे.

## धनत्रयोदशीला मुघलकालीन खजिना सापडला, खड्डा खोदताना घबाड हाती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील वटराणा येथे शोष खड्डा खोदताना दोन चांदीची नाणी सापडली. या नाण्यांवर फारसी भाषेत कलमा कोरल्या आहेत. ही नाणी मुघल बादशाह अकबर आणि औरंगजेबाची आहेत. ही नाणी १५ आणि १६ व्या शतकातील असल्याची माहिती आहे. ही नाणी गोंडपिपरी तालुक्यातील नितेश मेश्राम यांना शोष खड्डा खोदताना सापडली आहेत. त्यांनी ही नाणी जपून ठेवली आहे. या नाण्यांनी चंद्रपूरच्या इतिहासात अधिक भर टाकली आहे. चंद्रपूर जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. गोंडराजांच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत अनेक वास्तू उभ्या आहेत. चंद्रपूरच्या इतिहासात भर टाकणारी घटना गोंडपिपरी तालुक्यातील वटराणा येथून पुढे आली आहे. वटराणा येथील नितेश मेश्राम यांना शोषखड्ड्यासाठी खोदकाम करताना दोन चांदीची नाणी सापडली आहेत. ही नाणी चांदीची असून त्यांचं वजन ११ ग्रॅम आहे. या नाण्यांवर फारसी भाषेत कलमा लिहिलेल्या आहेत. मेश्राम यांनी ही नाणी जपून ठेवली आहेत. मेश्राम यांनी इतिहास प्रेमी निलेश झाडे यांना ही नाणी दाखवली. झाडे यांनी इतिहास अभ्यासक अशोक सिंह ठाकूर यांच्याशी संपर्क साधला.
फारसी भाषेत लिहिलेल्या कलमांचे अशोक सिंह ठाकूर यांनी वाचन केले. ही नाणी मुघल बादशाह अकबर आणि औरंगजेबाची असल्याचे त्यांनी सांगितले. या नाण्यांचा काळ १५ आणि १६ वे शतक आहे. गोंडपिपरी तालुका हा मुघलांच्या ताब्यात होता. वटराणा येथे त्या काळात मोठी वसाहत असावी. या भागात संशोधन झाल्यास मुघल काळातील इतिसावर प्रकाश पडू शकतो, अशी शक्यता इतिहासकारांनी वर्तविली आहे. गोलाकार आसलेलं चांदीचं नाणं औरंगजेबाचं आहे. या नाण्यावर फारसी भाषेत "सिक्का ज़द दर जहान चु बद्रे मुनिर. शाह औरंगजेब आलम गिर. हिजरी सन ११११", असं लिहीलं आहे. तर, चौकोणी नाणं अकबराचं आहे. त्यावर अकबराचं नाव कोरलेलं आहे. हिजरी सन ९९३ लिहीले आहे.




## माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमानिमित्त दुर्गम भागात मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पळसखेडा येथे कृषि मंत्री अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतील मोहीम एक दिवस बळिराजासाठी अंतर्गत सोयगांव तालुक्यातील दुर्गम भागात पळसखेडा येथे जाऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी गावकारींना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या विविध समस्या जाऊन घेतल्या. शेतकरी वर्गाशी संवाद साधताना विवध पिकातील किड व रोग नियंत्रण, खतांचे व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, महाडीबीटी योजनेची माहिती, शेतकरी गट माहिती तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आजच्या कार्यक्रमात पौष्टिक तृणधान्य वर्षनिमित्त राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानअंतर्गत ज्वारी बियाण्याचे शेतकरी याना मोफत वाटप करण्यात आले. तसेच यावेळी गावातील प्रगतिशील शेतकरी यांनी अडचणी मांडल्या यात प्रामुख्याने शेतकरी वर्गास दिवसा वीज मिळावी, वन्य प्राण्यांपासून शेताला कुंपण मिळावे, शाळेचा रस्ता दुरुस्त करावा तसेच सौर ऊर्जा प्रत्येकाला मिळावी आदी मागण्या मांडण्यात आल्या. आजच्या कार्यक्रमास प्रामुख्याने तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ, कृषि पर्यवेक्षक एच. बी. देशमुख, कृषि सहाय्यक के.एम. अहिरराव व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए. एस. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,तंटामुक्ती अध्यक्ष, पो.पाटील तसेच गावातील प्रगतशील महिला शेतकरी यांची उपस्थिती होती.





दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
SBI बँक
कन्नड
हिवरखेडा रोड व पिशोर रोडवरील
BSNL ऑफीससमोर एटीएम नागरीकांसाठी खुले

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# माझी 25 पैश्यांची दिवाळी..




संजय जेवरीकर
संपर्क क्र. 7887307789

आधुनिक केसरी

**आज प्रचंड झगमगाट घेऊन दिवाळी दरवर्षी येते, कपड्यांच्या आराशी मांडल्या जातात मात्र घराघरातील आनंद आज म्हणावा तसा दिसत नाही. हा आनंद परत देणारी दिवाळी कुठेतरी लोप पावत चाललीय. एकत्रित येऊन साजरी होणारी दिवाळी, त्याचा फराळ आणि एकूणच आनंदाची पर्वणी आता हुकत चाललीय. माणसा माणसात जोपर्यंत प्रेमाची हाक मारली जाणार नाही तोपर्यंत आनंदाची दिवाळी होणार नाही. आनंदाच्या गावाला जायचे असेल तर तो घरात शोधावा लागेल आणि आहे त्यातला आनंद स्वीकारावा लागेल..**

दिवाळी आली की मन जुन्या आठवणीत रमायला लागत, आताची झगमटाची दिवाळी त्या काळातील मिणमिणत्या पणतीच्या प्रकाशात नक्कीच प्रकाशमान होती. आयुष्य झरकन डोळ्यासमोरून निघून जाते, आठवणींचे टिम्ब मात्र कायम मनावर कोरलेले असते. ही दिवाळी नक्कीच मनाच्या पटलावर कायम कोरलेली आहे, आठवणी दाटून येतात आणि मन पुन्हा जेवरीच्या रहाट गल्लीत घुटमळत राहत. गावच्या पटवाऱ्याची दिवाळी अशी कशी असा प्रश्न नक्कीच मनात येईल, मात्र पटवारगिरी नंतर पदरात पडलेले फाटकेपन आणि त्यात वडिलांचा संघर्ष आजही मनात ठासून भरलाय, आज दिवाळीत मजा नाही राहिली, कपडे खरेदी रोजचीच आणि गोडधोड सुद्धा रोजचेच त्यामुळे आजची दिवाळी मनाला स्पर्श करतच नाही. माझी पंचवीस पैशाची दिवाळी आजही मनात घर करून बसलेली आहे. लहानपण आयुष्यातील अनंत आठवणींचा कालखंड. दहावीपर्यंत जेवरी येथेच राहिल्यामुळे त्या आठवणी पुन्हा सरपंच झाल्यानंतर ताज्या होत आहेत. आजही तिथे साजरा केलेला प्रत्येक क्षण मनपटालावर असा कोरला गेलाय. तात्या शेती करायचे, जमेल तेवढा आनंद आमच्या झोळीत टाकायचे. पण कुठलाही आनंद हा आजच्या श्रीमंतीच्या बडेजावपेक्षा नक्कीच श्रीमंत होता. गावाला जवळ निलंगा, कुठल्याही दळणवळणाच्या सुविधा तेव्हा नव्हत्या. आठवडी बाजार हे तेव्हा खरेदीचे मुख्य ठिकाण. पायी चालत निलंग्याला जावे लागायचे. धोतराचे एक पटकर घेऊन कधी कधी माझ्या हट्टापायी तात्या खांद्यावर बसवून निलंगा घेऊन जायचे. हातात एखादा बिस्किटचा पुडा किंवा छटाकभर खाऱ्यावर आमची स्वारी दिवसभराचे उन्ह अंगावर झेलायची. दिवाळी आली की हमखास तात्या मला घेऊन निलंगा जायचे. तिथले महागडे फटाके बघून आम्हाला पुन्हा जेवरीत घेऊ या आश्वासनावर परत फिरावे लागायचे. गावात सहा दुकान होती. एक वामन तारे आणि दुसरे भागवत सरवडे, तिसरे नामदेव मास्तर, चौथे पोस्टमास्तर, पाचवे संतराम सावरे, सहावे भानुदास सूर्यवंशी अशी सहा दुकाने होती. आम्हाला वामन तारेचे दुकान जवळ असल्यामुळे सगळी खरेदी तिथूनच व्हायची. अडल्या पडल्या लोकांना आधार होता. तात्या दिवाळीला पहिल्या दिवशी 25 पैसे द्यायचे, आम्ही त्यात टिकलीचा एक बुरुज, 10 कावळे, लवंग्या 10 फटाकड्या, दोन तीन फुलबाज्या, दोन तोटे असा बाजार घेऊन खुश होऊन जायचो. दिवसभर पुरवून ते वापरावे लागायचे, फुसक्या फटाकड्या गोळा करून त्याची दारू एका दगडावर ठेवून मोठा आवाज करण्याचा प्रयोग दिवसभर मजा आणायचा. डांबरी फटाकड्या हे आमचे मोठ्या आवाजाचे हत्यार होते. रात्री बॉम्ब आणि लक्ष्मी तोटा फोडून स्वारी झोपायला जायची. हाताने गोळा केलेली दारू पाहून आई हमखास चिडायची, पोटात जाऊन काहीतरी करून घेणार, इतक्या फटाकड्या का दिल्या म्हणून तात्यांवर चिडचिड करायची. लसूण नावाचा एक प्रकार तेव्हा होता, तो नुसता जमिनीवर आपटला तरी आवाज व्हायचा. आज हे सगळं हरवलंय, जेव्हा मुले लहान होती तेव्हा पहिल्यांदा 3 हजाराच्या फटाकड्या आणताना तात्या डोळ्यासमोर लख्ख उभे राहिले. त्यांच्या 25 पैशाचे मोल आज नाही. आजची दिवाळी प्रचंड झगमगाट घेऊन आलीय. दिवाळीचा ड्रेस शाळेतही वापरात यावा म्हणून खाकी चड्डी, पांढरा शर्ट आज कोण घेतोय.कपड्याच्या राशी आजही अस्वस्थ करतात..कितीतरी मुले आजही अशीच दिवाळी साजरी करत असतील याची जाणीव पावलोपावली होत राहतेय. पैश्यापेक्षाही तात्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आज लाखो रुपये देऊनही विकत मिळणार नाही? आज आठवण पुन्हा ताजी झाली. 25 पैश्याच्या दिवाळीने किती किती समृद्ध केलंय. आज कितीही पैसे ओतले तर तो आनंद मिळणार नाही. म्हणून आनंद कुठल्याही दुकानात, मॉलमध्ये विकत मिळत नाही. पाच पैशाची रेल्वे पळवण्यासाठी दिवसभर दोरा बांधण्यासाठी केलेली खटपट, आज फर्स्ट क्लास ए सी मधून फिरूनही मिळत नाही.



ऐन दिवाळीत तात्यांचा कॅन्सर डिटेक्ट झाला आणि पुरते हादरून गेलो. तात्यांची आठवण झाल्याशिवाय दिवाळी पुढे सरकतच नाही. अनेक आनंदाचे झाड उडवणारी दिवाळी तात्यासाठी मात्र दुःख घेऊन आली. आमचे सगळे कुटुंब अस्वस्थ झाले. कॅन्सरच्या दुर्धर आजारावर मात करून तात्या घरी आले मात्र काळाला मान्य नसावे, काळाने दोन वर्षानंतर झडप घातली. तात्यांना काळाने हिरावून नेले आणि आमच्या दिवाळीला गालबोट लागले.

# बुट्टे वडगावच्या ऋषिकेशला व कुटुंबियांना उद्धव ठाकरे यांनी दिला धीर

## श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुलने पहिली ते बारावीच्या शिक्षणाची घेतली जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील बुट्टे वाडगाव व परिसरामध्ये झालेले मुसळधार पावसाने शेत मालाचे नुकसान झाले असून या पावसामुळे शेतकऱ्यांची दिवाळी यंदा होते का नाही असा प्रश्न पडलेला असताना येथील चव्हाण कुटुंबियांची एबीपी माझा ने घेतलेल्या मुलाखातीत ऋषिकेश ने दिवाळी ला कपडे घेतले नसल्याचा तसेच शेतीच्या झालेल्या नुकसानीमुळे दिवाळी साजरा करणार नसल्याचा व्हिडीओ हा सोशल मीडिया मध्ये महाराष्ट्रभर चांगलाच व्हायरलं झाला बघता बघता मदतीचा ओघ वाढू लागला ऋषिकेश ला कपडे फटाके मिठाई अश्या विविध भेट वस्तू मिळाल्या महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्या व्हिडीओ ची दखल घेत माजी खासदार चंद्रकांत खैरे उपजिल्हा प्रमुख कृष्णा पाटील डोणगावकर यांच्या माध्यमातून दूरध्वनी द्वारे ऋषिकेश व कुटुंबियांशी संवाद साधला व झालेल्या नुकसानीतून सावरण्याचा धीर दिला यावेळी ऋषिकेश च्या आजींनी त्याच्या शिक्षणाविषयीं उद्धव ठाकरे यांच्या कडे मागणी केली उद्धव ठाकरे यांनी शब्द दिला शिक्षणाची जबादारी ही आमची यालाच प्रतिसाद म्हणून तेथून जवळच श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगापूर संचलित श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल सिद्धनाथ वाडगाव येथे संस्थेचे अध्यक्ष वाल्मिक सिरसाठ सचिव व शिवसेनेचे नगरसेवक डॉ आबासाहेब सिरसाट व प्रमोद महाजन यांनी उद्धव साहेबांनी दिलेला शिक्षणचा शब्द म्हणून ऋषिकेश व त्याच्या लहान भावाची बारावी पर्यंत चे शिक्षण देण्याची घोषणा त्या ठिकाणी शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली शिक्षणाच्या जबादारीमुळे चव्हाण कुटुंबियांनी श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल चे आभार मानले या कुटुंबाची भेट सुद्धा उद्धव ठाकरे घेणार असल्याची चर्चा आहे यावेळी माजी सभापती संतोष जाधव, नितीन खेडकर उपसरपंच ज्ञानेश्वर तिवाडे, चंद्रभान खेडकर,जीवन बैनाडे,महेश खेडकर,अनिल चव्हाण, भूषण राजपूत, प्रल्हाद खेडकर, शेषराव खेडकर आदी सह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.





# चेअरमनपदी ठोंबरे, व्हॉइसचेअरमनपदी मोरे


आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव :** पांढरी सोसायटीच्या चेअरमनपदी सुखदेव पिराजी ठोंबरे तर व्हॉइसचेअरमनपदी अण्णासाहेब जिजा मोरे यांची निवड करण्यात आली. नवनाथ कोल्हे, राजू शिंदे, भागचंद ठोंबरे, दत्तू काका ठोंबरे, बाप्पासाहेब मोरे, ज्ञानदेव ठोंबरे, दादासाहेब हळसे, सुनंदा ठोंबरे, फातिमाबी शेख, कांताबाई ठोँबरे, कमलबाई यादव आदि संचालकांची उपस्थिती होती तर निवडणूक अधिकारी म्हणून निलेश देशमुख यानी काम पहिले तर त्यांना सहकार्य गटसचिव शरद पाटील यांनी काम पहिले. यावेळी सुदाम मोरे, सुरेश ठोँबरे, अनिल मोरे, गणेश ठोंबरे, अनिल मोरे, वैजिनाथ तवार, विशाल चिद्रे, रवी मोरे, विशाल बोबांळे, बाळू मोरे, फैयाज शेख, गणेश चिद्रे आदीनी नवनियुक्त पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

# आमदार फारुख शाह यांच्या मागणीची दखल; दिवाळीत नागरिकांना रेशनचे कीट वाटप होणार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासनाकडून रेशनकार्ड धारकांना शंभर रुपयात दिवाळीचे अन्न, धान्य देण्याचे ठरले असून धुळे जिल्ह्यातील व शहरातील रेशनकार्ड धारकांना लवकरच कीट वाटप होणार असून तसेच ग्रामीण भागात कीट वाटप होण्यास सुरुवात झालेली आहे. या संदर्भात दि.18 ऑक्टोबर रोजी आ. फारुख शाह यांनी एका पत्रकाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली होती की दिवाळी ३ दिवसांवर असताना धान्य वाटप झालेले नाही. तसेच अनेक रेशन दुकानात महिन्यातून २ वेळेस अन्न, धान्याचा लाभ मिळावा असे नियम असताना सुद्धा फक्त महिन्यातून एकाच वेळेचे धान्य मिळालेले आहे. तर काही ठिकाणी अजूनपर्यंत गरीब रेशनकार्डधारकांना धान्याचा पुरवठा झालेला नाही. तरी पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी याची दखल घेऊन दिवाळीपूर्व धान्याचा पुरवठा करावा तसेच समाज कल्याणमार्फत मिळणाऱ्या दिव्यांग व वृद्धांना लाभ मिळावा कारण शहरातील संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या वृद्ध व दिव्यांग लाभार्थ्यांना ३ महिन्यापासून लाभ मिळालेला नाही. या पत्राची जिल्हाधिकारी यांनी दखल घेत रेशन कीट वाटप करण्याचे पुरवठा अधिकारी यांना आदेश दिले आहेत. त्यानुसार ग्रामीण भागात कीट वाटप होण्यास सुरुवात झालेली आहे. तसेच संजय गांधी योजनेचे तहसीलदार श्री कांबळे यांनी संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान त्यांच्या खात्यात तत्काळ देण्याची कारवाई सुरु केलेली आहे. आमदार फारुख शाह यांच्या या प्रयत्नाची नागरिकांकडून आभार व्यक्त होत आहे. लवकरच शहराच्या रेशन दुकानात दिवाळीत रेशन कीट वाटप होणार आहे.



# खवय्यांसाठी 'खाऊ गल्ली', पैठणमध्ये परिवार खाऊ गल्लीचे थाटात उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरात परिवार ग्रुपच्या वतीने 'खाऊ गल्ली' तयार केली आहे. या खावु गल्लीचे बुधवारी परिवारातील सुरेशचंद्र मानधने, राजेंद्रसिंह परदेशी,दिपक लखमले यांच्या हस्ते शुक्रवारी दि,21 रोजी उद्घाटन करण्यात आले. विविध शहरात अनेक ठिकाणी अशी 'खाऊ गल्ली' आहे. त्याच धरतीवर पैठण शहरातही खवय्यांसाठी एका छताखाली सुरक्षित ठिकाणी खावु गल्ली असावी अशी कल्पना राजेश मानधने यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आली. त्यामुळे खवय्यांना आता रस्त्यावर उभे राहून खावे लागणार नाही. या 'खाऊ गल्ली'चे शुक्रवारी जि.प.चे माजी सभापती विलासबापु भुमरे यांनी सदिच्छा भेट देवून अल्पोपहाराचा आनंद घेतला.



